सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ७ जानेवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक २७१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com







# सावरकरांचा विरोध आम्हाला मान्य नाही : मुख्यमंत्री

**जळगाव :** राज्यात महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने राजकीय वातावरण तापलं असून महायुतीमधील नेतेही एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीचं भाजपला आव्हान आहे. त्यामुळे, अजित पवारांकडून भाजपवर हल्लाबोल केला जात आहे. तर, भाजपकडूनही अजित पवारांवर पलटवार केला जात आहे. मात्र, अजित पवारांनी टीका करताना विचार करावा, अशी भूमिकाही काही भाजप नेत्यांनी घेतल्याचं दिसून येत आहे. त्यातच, भाजपने स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मुद्द्यावरुन अजित पवारांना घेरले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षालासुद्धा सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील, असं मंत्री आणि भाजपाचे नेते आशिष शेलार यांनी म्हटलं होतं. आता, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही तीच भूमिका मांडली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा कालही शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारधारेवर चालणारा होता, आजही आहे आणि उद्याही त्याच विचारांवर चालणारा पक्ष असेल, असे अजित पवारांनी म्हटले होते. त्यानंतर, राजकीय वर्तुळातून भाजपकडून टीका करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणूक प्रचार सभादरम्यान जळगावमध्ये पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विविध विषयावर भाष्य करत भूमिका मांडली. त्यामध्ये, अजित पवारांनाही मित्रत्वाचा सल्ला दिलाय. मला अस वाटत की, अजित पवार यांनी वीर सावरकरांचे विचार विरोध करण्याचे कारण नाही. त्यांनी तसं केल्याचं मला माहिती नाही, त्यांनी तसं केलं असेल का? आमची भूमिका पक्की, वीर सावरकरांचा विरोध आम्हाला मान्य नाही, असं देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट शब्दात सांगितलं. निवडणुकीसंदर्भाने राज्यात भाजपने एक पॉलिसी ठरवली आहे, त्यात एक दोन ठिकाणी अपवाद झाले. वेळेवर अल्ट्रनेट उमेदवार आणता आला नाही, दुसरीकडे आम्ही तसं काही केलेले नाही, असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी घराणेशाहीवरुन होणाऱ्या टीकेवर भाष्य केलं. दिवंगत नेते विलासराव देशमुख यांच्याबद्दल भाजप प्रदेशाध्यक्षांनी केलेल्या वक्तव्यावरही देवेंद्र फडणवीस यांनी भूमिका मांडली. ''रवींद्र चव्हाण यांनी दिलगिरी व्यक्त केलेली आहे, स्पष्टीकरणही दिले आहे. विलासराव यांच्याबद्दल पक्षविरहित सर्वांना आदर आहे, त्यांच्या स्मृती पुसल्या जाणार नाहीत. कुणीही निवडणुकीच्या काळात दिलगिरी व्यक्त करत नाही, त्यांनी केली आहे.

# पुण्यात तरुणांचा धाडसी दरोडा; ५२ लाखांचे दागिने लुटले

पुणे : भरदिवसा सराफी पेढीवर दरोडा घालून ५२ लाख रुपयांचे दागिने लुटणाऱ्या टोळीला गुन्हे शाखेने अवघ्या काही दिवसांत अटक केली. या कारवाईत तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्या तीन अल्पवयीन साथीदारांना ताब्यात घेण्यात आले आहे. चोरट्यांकडून २२४ ग्रॅम सोन्याचे व १८३ ग्रॅम चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

प्रवीण महादेव शिंदे (वय १८, रा. फुरसुंगी, हडपसर), राजदीप संतोष जगताप (वय २१, रा. लोणी काळभोर) आणि भावेश राजेश चव्हाण (वय २०, रा. रवीदर्शन, उन्नतीनगर, हडपसर) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याच गुन्ह्यात तीन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेण्यात आले आहे. पुणे-सोलापूर महामार्गावरील शेवाळवाडी परिसरात एका सराफी पेढीत शनिवारी (तीन जानेवारी) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास हा दरोडा पडला होता. आरोपी शिंदे, जगताप, चव्हाण आणि त्यांचे अल्पवयीन साथीदार यांनी आधी परिसराची पाहणी केली होती. त्या वेळी सराफी पेढीत सराफ व्यावसायिक एकटेच होते.

आरोपींनी कोयत्याचा धाक दाखवून सुमारे ५२ लाख रुपयांचे दागिने लुटून पलायन केले. घटनेची माहिती मिळताच मांजरी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला. या प्रकरणी मांजरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. गुन्ह्याची गंभीरता लक्षात घेता गुन्हे शाखेच्या दरोडा व वाहन चोरी विरोधी पथकासह युनिट दोन, युनिट पाच आणि युनिट सहा यांनी समांतर तपास सुरू केला.

सराफी पेढीतील सीसीटीव्ही चित्रीकरण व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी छत्रपती संभाजीनगर येथे पसार झाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तेथून दोन अल्पवयीनांसह आरोपींसह राजदीप जगताप याला ताब्यात घेण्यात आले.



# टँकरने दुचाकीला उडवले; तिघांचा मृत्यू

**सोलापूर :** महाराष्ट्रात गेल्या काही महीन्यांपासून वाहनांच्या अपघातीच्या घटना होत असल्याच पहायला मिळत आहेत. तसचं एक लहानसा परिवाराचा भिषण अपघातात दुर्दैवी मृत्यु झाला आहे. हा अपघात सोलापुर -पुणे महामार्गावर पंढरपूर पुलाजवळ आज पहाटेच्या ३ च्या सुमारास एका भरधाव केमिकल टँकरने दुचाकीला समोरासमोर जोराची धडक दिली. दुचाकीवरील आई, वडील आणि त्यांच्या १५ वर्षांच्या मुलाचा जागीच मृत्यू झाला आहे.

हे कुटुंब मूळचे नंदुरबार जिल्ह्यातील असून ऊसतोडणी संपवून आपल्या गावाकडे परतत असताना त्यांच्यावर काळाने झडप घातली आणि होत्याच नंव्हत झालं. नंदुरबार जिल्ह्यात एक गंभीर अपघात झाला असून, तीन ऊसतोड कामगारांचा मृत्यू झाला आहे. माहितीप्रमाणे, हे कुटुंब पहाटे सुमारे ३ वाजता आपल्या दुचाकीवरून गावाकडे जात होते. अपघात पंढरपूर पुलाजवळ घडला, जेव्हा समोरून येणाऱ्या वेगवान केमिकल टँकरने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, दुचाकी पूर्णपणे चक्काचूर झाली आणि तिघेही महामार्गावर उडाले. घायाळ झालेल्या कामगारांना तात्काळ स्थानिक रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र तिघांनी घटनास्थळीच प्राण सोडले.




लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तज्ज्ञ शिक्षकांच्या तात्पुरत्या नियुक्त्या; ९ जानेवारीला मुलाखत

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** युपीएससीमार्फत होणाऱ्या कंम्बाईंड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (सीडीएस) २०२६ च्या तयारीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे तज्ज्ञ शिक्षकांची तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात येणार आहे. या शिक्षकांना प्रति तास रुपये ३०० असे मानधन दिले जाणार आहे. तरी पात्र प्राध्यापकांनी ९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी साडेदहा वाजता मुलाखतीसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, विभागीय आयुक्त कार्यालय परिसर, नाशिक रोड, नाशिक येथे उपस्थित राहावे.

प्रशिक्षणाचा कालावधी सीडीएस-६६ कोर्ससाठी १९ जानेवारी २०२६ ते ३ एप्रिल २०२६ आणि सीडीएस-६७ कोर्ससाठी १५ जून २०२६ ते २८ ऑगस्ट २०२६ असा दोन टप्प्यात राहील. इंग्रजी, गणित, सामान्य ज्ञान-(सामान्यज्ञान, भूगोल, इतिहास, भारतीय राजकारण) आणि सामान्य विज्ञान या विषयांसाठी तज्ज्ञ शिक्षकांची आवश्यकता आहे. यासाठी संबंधित अभ्यासक्रमाशी निगडित पदवीधर किंवा पदव्युत्तर असणे आवश्यक आहे. तसेच स्पर्धा परीक्षांच्या तयारीबाबत कमीत कमी दोन वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असणे बंधनकारक आहे.



# निर्भीडता, समाजहित या मूल्यांशी निष्ठा राखणे हीच खरी पत्रकारिता : अमोल तांबे

**त.भा. वृत्तसेवा,**

**रेणापूर, ६ जानेवारी :** सत्य, निर्भीडता आणि समाजहित या मूलभूत मूल्यांशी निष्ठा राखणे हीच आजच्या पत्रकारितेची खरी गरज असल्याचे प्रतिपादन पोलीस अधिक्षक अमोल तांबे यांनी केले.

मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त रेणापूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी येथील रेणूका देवी मंदिर सभागृहात पत्रकारांच्या सन्मानार्थ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस अधिक्षक तांबे बोलत होते. मंचावर तहसिलदार प्रशांत थोरात, ग्रामीण रुग्णालयाच्या अधिक्षका डॉ. अनिता अलगुले, जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता सी. बी. काळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीधर रेड्डी, ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल कटके, चंद्रकांत कातळे, पत्रकार संघाचे अध्यक्ष नामदेव शिंदे, प्राचार्य सिध्देश्वर मामडगे, ॲड. तानाजी कणसे, ॲड. प्रशांत अकनगिरे, उटगे गुरुजी, सरपंच रमेश कटके यांच्यासह यांची प्रमुख उपस्थिती होती.



पोलीस अधीक्षक तांबे यांनी यावेळी बोलताना, विज्ञानाच्या युगात पत्रकारितेत फार मोठा बदल आहे. तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे डिजिटल मीडिया, सोशल मीडिया, वेब पोर्टल्स यांचा प्रभाव दिवसेदिवस वाढत आहे. बातम्या क्षणात पोहोचत असल्या तरी त्यामध्ये सखोलता, सत्यता व सामाजिक बांधिलकी कमी होत असून टीआरपी, व्ह्यूज आणि जाहिरातींच्या स्पर्धेत अनेकदा सनसनाटीपणा, अफवा व अप्रमाणित माहितीला प्राधान्य दिली जात असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले . तर श्रीराम विद्यालयाच्या महादेव बन यांनी स्वागत गित सादर केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तालुक्यांतील पत्रकारांचा पेन, डायरी पुष्पगुच्छ देवुन सन्मान करण्यात आला.

यावेळी तहसिलदार थोरात व ग्रामीण रुग्णालयाच्या अधिक्षका डॉ अलगुले यांनी मनोगत व्यक्त करताना पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या . कार्यक्रमाचे प्रास्ताविक चंद्रकांत कातळे यांनी केले. सूत्रसंचलन अमृतेश्वर स्वामी यांनी तर आभार निजाम शेख यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सिद्धार्थ चव्हाण, रफीक शिकलकर, ईश्वर बद्दर, कोंडीराम काळे, भरत भोसले, बालाजी कटके, शिवाजी येमते, सुधाकर दहिफळे यांनी परिश्रम घेतले.

## मुख्यमंत्र्यांची आज लातुरात प्रचार सभा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपा उमेदवारांच्या प्रचारासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बुधवार दि. ७ जानेवारी रोजी लातूर येथे येत आहेत. सकाळी ११ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथील मैदानावर मुख्यमंत्र्यांची प्रचार सभा होणार आहे.



मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या प्रचार सभेस जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले, माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील मुरुमकर, आ. रमेश कराड, कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आ. अभिमन्यू पवार, माजी खा. सुनिल गायकवाड यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

या सभेत मुख्यमंत्री लातूरच्या विकासाचा रोडमॅप सादर करणार आहेत. लातूर मनपा क्षेत्रातील भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते, नागरिक आणि मतदारांनी यासभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन निवडणूकप्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर, डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर व शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले आहे.

## २५ अंध युवक-युवतींना मसाज प्रशिक्षण प्रमाणपत्राचे वितरण

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** सामाजिक उत्तरदायित्व कार्यक्रमांतर्गत अंध युवक - युवतींसाठी आयोजित मसाज प्रशिक्षण शिबिरातील २५ प्रशिक्षणार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.बुधोडा, ता. औसा येथील ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान संचलित स्वाधार अंध-अपंग प्रशिक्षण व पुनर्वसन केंद्रात ॲटलास कॉपको (इंडिया) लि . यांच्यावतीने हे प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले.

यावेळी बोलताना प्रतिष्ठानचेअध्यक्ष हरिश्चन्द्र सुडे यांनी या शिबिराच्या माध्यमातून दिव्यांगांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगितले. आज समाजात अनेक अंध तरुण बेरोजगार आहेत.

दिव्यांग व्यक्ती हे समाजाकडून घेणारे नव्हे तर भरभरून देणारे व्हावेत, हाहीया उपक्रमागचाप्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी प्रशिक्षण घेतलेल्या २५ जणांना प्रमाणपत्र व व्यवसाय किट तसेच पुनर्वसन निधी म्हणून प्रत्येकी पाच हजार रुपयांचा धनादेश देण्यात आलं.या ॲक्युप्रेशर व मसाज चिकित्सा प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत महाराष्ट्रातील ५०० हुन अधिक अंध दिव्यांगांना अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

याप्रसंगी दत्तात्रय पवार, शांतीलाल सुबा, हरिकिशोर उपाध्याय यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कमलाकर बावगे यांनी केले. सूत्रसंचालन हरीश काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन आकाश साबळे यांनी केले

## आशा स्वयंसेविकांना आ. कराडांनी दाखवला आशा चित्रपट

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या आशा स्वयंसेविकांच्या कार्यावर प्रकाश टाकणारा त्यांची कहाणी मांडणारा राज्य शासनाचा सर्वोत्कृष्ट पुरस्कार प्राप्त आशा हा सिनेमा आ. रमेशआप्पा कराड यांच्या वतीने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील चारशे आशा स्वयंसेविकांना मंगळवारी दाखवण्यात आला. यावेळी युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड हे आवर्जून उपस्थित होते. सिनेमागृहातून चित्रपट पाहून बाहेर आल्यानंतर ऊर्जा मिळाल्याचे प्रत्येक आशा स्वयंसिकांच्या चेहऱ्यावर दिसून येत होते.

ग्रामीण भागातील महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यामध्ये आशा स्वयंसेविकांचे मोठे योगदान असून त्यांचे कार्यावर प्रकाशझोत टाकणारा आणि ग्रामीण भागाचे वास्तव सांगणारा आशा हा सिनेमा नुकताच प्रदर्शित झाला या सिनेमात अभिनेत्री रिंकू राजगुरू यांनी आशा स्वयंसेविकेच्या भूमिकेला न्याय दिला असून पगारीसाठी नव्हे तर स्वतःच्या समाधानासाठी काम करणाऱ्या (मालती) आशा हिच्या चेहऱ्यावर संयम, डोळ्यात तगमग आणि आतून असणारी जिद्द दिसून आली. चालत रहा पुढे हे गीत प्रेक्षकांना ऊर्जा देऊन जाते.

चित्रपट सुरू होण्याअगोदर उपस्थित आशा स्वयंसेविका यांच्याशी संवाद साधताना युवा नेते ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, आशा स्वयंसेविकांचे समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचवणारे मोठे कार्य आहे या कार्याची आ. रमेशआप्पा कराड यांनी वेळोवेळी दखल घेतली असून प्रेरणा मिळावी यासाठीच आशा चित्रपट दाखविण्याचा सुयोग त्यांनी घडून आणला आहे असे बोलून दाखवले.

याप्रसंगी भाजपाचे वसंत करमूडे, चंद्रकांत कातळे, भाऊसाहेब गुळबिले, ओम चव्हाण, राम भताने, दिलीप पाटील, तालुका संघटक आढळकर, रेखा कौटबे, जयश्री थोरमोटे यांच्यासह अनेकांची




सुरेखा पुरी, अनुसया फड, शीला आचार्य यांच्यासह स्वयंसेविका जिल्हा समूह संघटक संगीता डावरे, श्रीमती बालिका बिराजदार, उपस्थिती होती. यावेळी तब्बल चारशे आशा स्वयंसेविकांनी चित्रपट पाहण्याचा आनंद घेतला.

## 'केशवराज'मध्ये दर्पण दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. ०६ जानेवारी २०२६ मंगळवार रोजी आद्यपत्रकार बाळशास्त्री जांभेकर जयंती तथा दर्पण दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. सकाळच्या सत्रात या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक मराठवाडा नेता या वृत्तपत्राचे मुख्य संपादक रामेश्र्वर बद्दर व दैनिक लातूर समाचारचे कार्यकारी संपादक शिवाजीराव जडे तर दुपार सत्रात कार्यक्रमाचे अध्यक्ष केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा विद्यालयाचे उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, प्रमुख पाहुणे छएथड १८ लोकमत इलेक्ट्रॉनिक्स मीडियाचे पत्रकार शशिकांत पाटील, खबर से हकीकत साप्ताहिकाचे संपादक शिरीषकुमार शेरखाने तसेच पत्रकार बसवेश्र्वर पसारे, सुधीर चेरेकर यांची मंचावर उपस्थिती होती.

या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता आणि मराठी वृत्तपत्राचे




जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. यानंतर दैनिक मराठवाडा नेताचे मुख्य संपादक रामेश्र्वर बद्दर, छएथड १८ लोकमत इलेक्ट्रॉनिक्स मीडियाचे पत्रकार शशिकांत पाटील, खबर से हकीकत तक साप्ताहिकाचे संपादक शिरीषकुमार शेरखाने, लातूर समाचारचे कार्यकारी संपादक शिवाजीराव जडे, पत्रकार बसवेश्र्वर पसारे, सुधीर चेरेकर यांचा विद्यालयाच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी सकाळ सत्रातील प्रमुख पाहुणे दैनिक मराठवाडा नेता वृत्तपत्राचे मुख्य संपादक रामेश्र्वर बद्दर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करावे, ग्रंथांचे वाचन करावे, सामान्य ज्ञान वाढवावे व स्वतःचे ध्येय निश्चित करून त्याप्रमाणे वर्तन करावे असे सांगितले. दुसरे प्रमुख पाहुणे लातूर समाचारचे कार्यकारी संपादक शिवाजीराव जडे यांनी बाळशास्त्री जांभेकर यांचा जीवनपरिचय सांगून, दर्पण वृत्तपत्राविषयी माहिती सांगितली. तर दुपार सत्रातील प्रमुख पाहुणे शशिकांत पाटील यांनी विद्यार्थ्यांना सत्य घटनेवर आधारित उदाहरणे सांगून पत्रकारितेचे महत्त्व सांगितले तसेच दुसरे प्रमुख पाहुणे शिरीषकुमार शेरखाने यांनी पत्रकारिता व्यवसायात काम करत असताना येणारे अनुभव सांगून दर्पण दिनाचे महत्त्व सांगितले.

अध्यक्षीय समारोपात विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी समाजात जागृती निर्माण करण्याचे काम बाळशास्त्री जांभेकर यांनी केले असे सांगितले. समाजाचे प्रतिबिंब दाखवण्याचे कार्य पत्रकार करतात. सकाळ सत्रातील या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत वनमाला कलुरे यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विपुला उरगुंडे यांनी केले तर शैला कुलकर्णी यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. दुपार सत्रातील कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत मनिषा पाटील यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन दिपाली मुचाटे यांनी केले तर कल्पना कडेपूरकर यांच्या कल्याण मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

प्रसिद्धी विभागांतर्गत संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, सहप्रमुख मीरा चामवाड, प्रसिद्धी विभाग प्रमुख वनमाला कलुरे, सहप्रमुख मनिषा पाटील तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## महसूलच्या २० सेवा ऑनलाईन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या शासकीय सेवा नागरिकांना ठराविक कालमर्यादेत आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग कार्यरत आहे.

नागरिक आता 'आरटीएस महाराष्ट्र' मोबाईल प किंवा 'आपले सरकार' वेब पोर्टलच्या माध्यमातून उपलब्ध सेवांची माहिती पाहू शकतात आणि ऑनलाइन अर्जही करू शकतात. सेवा देण्यात विलंब झाल्यास किंवा नाकारल्यास प्रथम व द्वितीय अपील संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तर तृतीय अपील आयोगाकडे करता येते. महसूल विभागांतर्गत उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, सॉल्व्हन्सी प्रमाणपत्र आदी एकूण २० अधिसूचित सेवा या कायद्यांतर्गत उपलब्ध आहेत. या सेवा १ ते २१ दिवसांच्या कालमर्यादेत पूर्ण केल्या जातात. नागरिकांनी 'आपले सरकार' पोर्टलवर लॉग-इन करून सेवा निवडणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आणि अर्ज सादर करणे अपेक्षित आहे.

अर्ज सादर झाल्यानंतर मिळणाऱ्या एसीके क्रमांकाच्या आधारे अर्जाची स्थिती ऑनलाइन ट्रॅक करता येते. छाननी व पडताळणीनंतर मंजूर प्रमाणपत्र थेट ऑनलाइन उपलब्ध करून दिले जाते. ऑनलाइन अर्ज करणे शक्य नसलेल्या नागरिकांसाठी 'आपले सरकार सेवा केंद्रां'मार्फतही ही सुविधा उपलब्ध आहे. या केंद्रांद्वारेही सर्व सेवा ऑनलाइन पद्धतीनेच दिल्या जातात.

## आयएमए स्वस्थ नारी अभियान चेअरमनपदी डॉ.सुरेखा काळे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** लातूरच्या आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनियकार्याबद्दल येथील डॉ. सुरेखा दिनकर काळे यांची इंडियन मेडिकल असोसिएशनच्या स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान चेअरमनपदी निवड करण्यात आली आहे.

डॉ. सुरेखा काळे यांनी यापूर्वी लातूर आयएमएच्या अध्यक्ष म्हणूनही नेत्रदीपक कार्य केले



आहे. तसेच त्या लातूर वूमेन विंगच्या अध्यक्षा, मिशन पिंक मराठवाडा को-ऑर्डिनेटर, वुमन विंग प्रदेश उपाध्यक्षा म्हणूनही त्यांनी उत्कृष्ट कार्य केले आहे. स्त्रियांचे आरोग्य, समुपदेशन, कॅन्सर जनजागृती, रक्तक्षय या विषयांवर कार्य करून त्यांनी महिलांमध्ये जनजागृती आणि प्रबोधन केले आहे. सदर निवड आयएमएचे प्रदेशाध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी यांनी केली आहे. या निवडीबद्दल आरोग्य क्षेत्रातूनअभिनंदन करण्यात येत आहे.

## लातूर जिल्ह्यात तीन स्थानिक सुट्ट्या जाहीर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** जिल्ह्यासाठी २०२६ मधील तीन स्थानिक सुट्ट्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी ०५ जानेवारी, २०२६ रोजीच्या अधिसूचनेनुसार जाहीर केल्या आहेत. यानुसार २८ ऑगस्ट २०२६ (शुक्रवार) रोजी रक्षाबंधन, १८ सप्टेंबर २०२६ (शुक्रवार) रोजी ज्येष्ठागौरी पूजन, ६ नोव्हेंबर २०२६ (शुक्रवार) रोजी धनत्रयोदशी निमित्त लातूर जिल्ह्यात स्थानिक सुट्टी राहणार आहे.

## इज्तेमाचा समारोप

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ६ जानेवारी :** लातूर बारही रोडवरील मुरुड अकोला येथे आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय इज्तेमाचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात झाला.सामाजिक समता, शांतता, सलोखा वाढीस लागावायाकरिता सदर सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात सायंकाळच्या सुमारास सामूहिक नमाज पठन करण्यात आले. त्यावेळी हजारोंच्या संख्येने मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते. मोहम्मद पैगंबर यांनी दिलेल्या शिकवणीचे अनुकरण करा, दिवसातून पाचवेळा नमाज पठण करा, आपल्या वर्तनातून कुटुंबाबरोबरचआपला शेजारीही दुखावला जाणार नाही याची काळजी घ्या. सत्य मार्गाने चला,असा संदेश यावेळी देण्यात आला. या इज्तेमामध्येलातूर तालुक्यातील मुरुड, जोडजवळा, लातूर परिसरातीलमुस्लिमसमाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी समाज बांधव सहभागी झाले होते.

## जाहीर प्रगटन

चाकूर तालुक्यातील विशेषतः मौजे नळेगाव परिसरातील तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार माधवराव नागनाथ तोंडारे वय : ५० वर्ष, धंदा : व्यापार रा. नळेगाव, ता. चाकूर, जि. लातूर यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन व अधिकृत केल्यावरून सदरचे जाहीर प्रगटन देण्यात येते की,

माझे पक्षकार यांनी अनिल गोपाळदास पल्लोड, वय : ५० वर्ष, धंदा : व्यापार/शेती रा. अभिजीत अपार्टमेंट, मोती नगर, लातूर यांच्या मालकी व ताब्यातील मौजे नळेगाव, ता. चाकूर जि. लातूर येथील गट नं. ६७०/२/१ मधील एकूण क्षेत्र ३ हे. २४ आर असून त्यापैकी १ हे. ०० आर जमीन ज्याची चतु:सीमा खालीलप्रमाणे पूर्वेस-अमोल बुदरे, अजित बुदरे व ॲड. तोंडारे यांची जमीन, पश्र्चिमेस -स्मशानभूमी, दक्षिणेस-शेषराव पाटील यांची जमीन, उत्तरेस-पाणंद रस्ता येणेप्रमाणे वरील चतुः सिमेच्या आतील ०१ हे. ०० आर जमीन माझे पक्षकार यांना विद्यमान जमीन मालकांसोबत कायम विक्री करण्याचा लेखी ठराव करून सदर ठरावापोटी विद्यमान जमीन मालकांनी माझे पक्षकाराकडून इसार रक्कम म्हणून काही रक्कम स्विकारलेली आहे व उर्वरित रक्कम देवून लवकरच जमिनीचे खरेदीखत करून घेणार आहेत. सदरील जमीन ही निर्विवाद व बोजारहित असलेची खात्री माझे पक्षकारांना दिलेली आहे.

तरी सदरील वर्णनीय जमिनीबाबत कोणाचा उजर , हरकत, गहाणखत , तारण, ठरावपत्र, लिज , बक्षीसपत्र , दानपत्र, पोटगी हक्क, कोर्ट डिक्रि , आधारे बोजा वा इतर कसल्याही प्रकारचा हक्कसंबंध व अधिकार असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासून ७ ( सात ) दिवसाचे आत माझे खालील नमूद कार्यालयीन पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रासह लेखी उजर दाखल करून पोच घ्यावी. जर वरील मुदतीत कोणाचा उजर नाही आला तर सदरील जमीन ही निर्विवाद व निर्जोखमी आहे असे माझे पक्षकार समजतील व त्यानंतर जमीन मालकासोबतचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर आलेला उजर माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी. सबब हे जाहीर प्रगटन

जाहीर प्रगटन देणार : **माधवराव नागनाथ तोंडारे, रा. नळेगाव, ता. चाकूर, जि . लातूर**
**तर्फे ॲड. आर. एन. तोंडारे,**
**रेड्डी बिल्डिंग, बुलढाणा बँकेजवळ, मेन रोड, नळेगाव , ता. चाकूर, जि लातूर**
**मोबा. नं . ९४२१३ ६८२२९.**

## थोडक्यात...

### दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये बालिका दिन साजरा




**बिडकीन :** पैठण तालुक्यातील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल निलजगाव येथे ३जानेवारी रोजी क्रांति ज्योति सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिवस हा राष्ट्रीय बालिका दिन म्हणुन उत्साहात साजरा करण्यात आला .याप्रसंगी शाळेचे अध्यक्ष ओमप्रकाश जैस्वाल , शाळेचे मुख्याध्यापक मयूर स्वामी उपस्थित होते .बहुतेक विद्यार्थ्यांनि सावित्रीबाई फुले यांच्या सारखीच वेषभूषा धारण केली होती. कु.गौरी मोगल , पूजा कृष्णा मोगल इत्यादि विद्यार्थ्यांनी हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कु.आरोहि दादासाहेब लेंडे ,कु.आदिबा असीम पठाण इत्यादि भाषणे केली. कु.श्रेया सोमीनाथ हुड् ,कु. गौरी नवनाथ हुड् , कु.श्रावणी राहुल पवार कु.शिवकन्या कृष्णा मोगल ,कु.प्रकृती कृष्णा हुड् ,इत्यादिनि खुप छान् अशी वेषभूषा धारण केली होती.शिक्षिका.कल्पना साळवे यांनी आपल्या मनोगत सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष छोट्या छोट्या अनुभव कथन केला. शिक्षिका .प्रतीक्षा स्वामी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. कार्यकमाचे सूत्रसंचालन शिक्षक सचिन साळवे यांनी यशस्वितेसाठी सर्व शिक्षकांनी मेहणत घेतली .

### ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलची बिडकीन पोलीस स्टेशनला भेट



**बिडकीन :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आज दि ०५ जानेवारी रोजी बिडकीन पोलीस स्टेशनला भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीची प्रत्यक्ष व सविस्तर माहिती देण्यात आली. या प्रसंगी बिडकीन पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, अजित शेकडे सर तसेच इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक स्वागत केले. विद्यार्थ्यांनी पोलीस स्टेशनमधील विविध विभागांची पाहणी करत प्रत्यक्ष माहिती घेतली. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना पोलीस अधिकाऱ्यांनी समर्पक व मार्गदर्शक उत्तरे देऊन त्यांच्या शंका दूर केल्या. या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये कायद्याबद्दल आदर, शिस्तीचे महत्त्व तसेच सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होण्यास मदत झाली.

### राज्य कला प्रदर्शन : प्रवीण देशमुख यांच्या छायाचित्राची राज्यस्तरीय निवड

**छत्रपती संभाजीनगर :** मुंबईतील प्रतिष्ठित काळाघोडा परिसरातील



जहांगीर कला दालनात होणाऱ्या ६५व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनासाठी पूर्णा तालुक्यातील चुडावा येथील हौशी छायाचित्रकार प्रवीण रमाकांत देशमुख यांच्या छायाचित्राची निवड झाली आहे. ही निवड उपयोजित कला विभागातून झाल्याने त्यांच्या सर्जनशील क्षमतेला राज्यस्तरीय मान्यता मिळाली आहे. प्रवीण रमाकांत देशमुख यांचे Maharashtrian Woman या शीर्षकाचे छायाचित्र २०२५-२६ या वर्षासाठी आयोजित ६५व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनात प्रदर्शनासाठी निवडण्यात आले आहे. महाराष्ट्रातील नामवंत कलाकारांच्या स्पर्धात्मक सहभागातून ही निवड झाल्याने देशमुख यांच्या कलात्मक दृष्टीकोनावर गुणवत्ता शिक्कामोर्तब झाले आहे.या यशाबद्दल चुडावा परिसरात त्यांचा सत्कार करण्यात आला.

### रणपति शिवराय स्वारी आग्रा ३० रोजी प्रदर्शित

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर येथे 'रणपति शिवराय स्वारी आग्रा' या आगामी मराठी चित्रपटाच्या भव्य सादरीकरणाने सांस्कृतिक इम्पॅक्ट निर्माण केला. ढोल-ताशांच्या गजरात, रोषणाईने नटलेल्या रंगमंचावर छत्रपती शिवाजी महाराज आणि शिलेदारांच्या प्रवेशाने उपस्थितांमध्ये उच्च पातळीचा उत्साह निर्माण झाला. दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित आणि पॅनोरमा स्टुडिओज व मुगाफी निर्मित हा चित्रपट शिवकालीन इतिहासातील आग्रा भेटीचा रणनीतिक अध्याय प्रभावीपणे मांडतो. अभिजीत श्र्वेतचंद्र शिवरायांच्या भूमिकेत दिसणार असून 'महारुद्र शिवराय' गीताचे सादरीकरणही लक्षवेधी ठरले. चित्रपट ३० जानेवारीला प्रदर्शित होणार आहे.

### रिलॅक्सो फूटवेअर स्प्रिंग समर २०२६ कलेक्शन सादर

**मुंबई :** भारतातील सर्वात मोठी आणि सर्वात विश्र्वासार्ह फूटवेअर उत्पादक कंपनी रिलॅक्सो फूटवेअर्स लिमिटेडने आज डिस्ट्रिब्युटर्स मीटमध्ये त्यांच्या स्प्रिंग समर २०२६ कलेक्शनचे अनावरण केले. नवीन लाइनअप ब्रँडची बदलत्या जीवनशैलीची तीक्ष्ण समज प्रतिबिंबित करते, भारताच्या चालण्याच्या, कार्य करण्याच्या आणि त्याच्या शैली व्यक्त करण्याच्या पद्धतीसाठी आराम, कार्यक्षमता आणि समकालीन डिझाइन एकत्र आणते.

### लक्ष्मीबाई मुरलीधर लेणेकर यांचे निधन

**छत्रपती संभाजीनगर :** हडको नवजीवन कॉलनी येथील रहिवासी



लक्ष्मीबाई मुरलीधर लेणेकर (७७) यांचे आज दि.६ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर आज संध्याकाळी ६ वाजता एन-११ येथील जीवन स्मशानभूमी येथे अत्यंसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. संतोष लेणेकर यांच्या त्या आई होत्या.

### गीताबाई चव्हाण यांचे निधन

**सोयगाव :** तालुक्यातील जरंडी येथील गीताबाई रायमल



चव्हाण(वय. ४२) यांचे सोमवारी (दि.५) पहाटे तीन वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्यावर सोमवारी (दि.५)सकाळी अकरा वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, दोन भाऊ असा परिवार आहे. येथील व्यावसायिक समाधान चव्हाण यांची ती बहीण होती.

# कन्नड नगरपालिकेचे सूत्र काँग्रेसच्या हाती

## ▶▶ स्वच्छ शहराचे स्वप्न साकारण्याचा निर्धार; शेख फरीनबेगम नगराध्यक्षा

तभा वृत्तसेवा

**कन्नड , दि. ६ जानेवारी :** कन्नड नगरपालिकेच्या नगराध्यक्षा म्हणून काँग्रेस पक्षाच्या शेख फरीनबेगम अ. जावेद यांनी सोमवारी (दि. ५) पदभार स्वीकारला. राज्य सरकारकडून निधी मिळण्याबाबत अनिश्र्चितता असली, तरी निधीअभावी नगरपालिकेच्या विकासकामांवर परिणाम होऊ दिला जाणार नाही. यासाठी सत्ताधारी शिंदेसेनेच्या नगरसेवकांना सोबत घेऊन समन्वयाने नगरपालिकेचा कारभार केला जाईल, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला.

नवनिर्वाचित नगराध्यक्षा शेख फरीनबेगम यांच्या पदग्रहण समारंभात काँग्रेसचे प्रदेश सचिव व माजी आमदार नामदेवराव पवार बोलत होते. सत्ताधारी पक्षाशी समन्वय ठेवल्यास विकासनिधी मिळण्यात अडचण येणार नाही. कन्नडच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना नगराध्यक्षा शेख फरीनबेगम म्हणाल्या की, माझे सासरे माजी नगराध्यक्ष अब्दुल वाहेद यांचे स्वच्छ व शांत शहराचे स्वप्न पूर्ण करण्याचा माझा संकल्प आहे. पदभार स्वीकारल्यानंतरचे सुरुवातीचे सहा महिने शहर स्वच्छता, पाणीपुरवठा आणि मूलभूत सुविधांच्या नियोजनासाठी प्राधान्याने देण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात सर्वांचे पारंपरिक तुतारी वाजवून स्वागत करण्यात आले. यावेळी मंचावर माजी आमदार नामदेवराव पवार, रंजना पवार, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष किरण पां. डोणगावकर, तालुकाध्यक्ष गणेश शिंदे, डॉ. सीताराम जाधव, अब्दुल अमीन अ. रहमान, माजी नगराध्यक्ष अब्दुल रफिक गणी, विलास वाडेकर, भाजपचे मनोज पवार, बन्सीधर निकम, सचिन पवार, डॉ. सदाशिव पाटील, कौतिकराव पवार, शाम पिरथानी, बाबा शेख यांच्यासह माजी व नवनिर्वाचित नगरसेवक, महिला-पुरुष कार्यकर्ते तसेच नगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक सचिन पवार यांनी केले. सूत्रसंचालन योगेश पाटील यांनी केले, तर आभार नगरसेवक जावेद अ. वाहेद शेख यांनी मानले.






**कन्नड :** कन्नड नगरपालिकेच्या नगराध्यक्षा म्हणून शेख फरीनबेगम अ. जावेद यांनी पदभार स्वीकारताना माजी आमदार नामदेवराव पवार, रंजना पवार, काँग्रेस जिल्हाध्यक्ष किरण पां. डोणगावकर, नगरसेवक अब्दुल जावेद शेख, मुख्याधिकारी रवींद्र लांडे, भाग्यश्री बेडगे आदी.

## कलाकारांनी सांगितले नववर्षातील संकल्प

तभा वृत्तसेवा

**संभाजीनगर दि.६ जानेवारी :** नववर्ष २०२६ च्या स्वागताच्या पार्श्र्वभूमीवर एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय कलाकारांनी वैयक्तिक विकास, सकारात्मकता आणि नव्या उद्दिष्टांसह आपले संकल्प जाहीर केले आहेत. 'घरवाली पेडवाली' मालिकेतील जीतूची भूमिका साकारणारे पारस अरोरा यांनी अभिनयासोबत सर्जनशीलतेला चालना देण्यासाठी गिटार शिकण्याचा आणि स्वतःला नवी आव्हाने देण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. 'हप्पू की उलटन पलटन'मधील कटोरी अम्मा फेम हिमानी शिवपुरी यांनी पर्यावरणपूरक दृष्टीकोन स्वीकारत नववर्षाच्या सुरुवातीला एक झाड लावण्याची परंपरा सुरू करण्याचा निर्धार केला आहे. कृतज्ञता, नियोजन आणि आरोग्यदायी दिनचर्येलाही त्या प्राधान्य देणार आहेत.'भाबीजी घर पर है २.०'मधील मनमोहन तिवारी साकारणारे रोहिताश्व गौड यांनी अभिनय कौशल्य वृद्धिंगत करणे, नव्या संधींचा शोध घेणे आणि कुटुंबासोबत भारताच्या ईशान्य भागात पर्यटन करण्याचा संकल्प जाहीर केला आहे. नववर्षासाठी कलाकारांचे हे संकल्प प्रेरणादायी ठरत आहेत.

## आ. बंब यांच्या हस्ते मका खरेदी केंद्राचे उद्घाटन

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.६ जानेवारी :** शासकीय आधारभूत मका खरेदी केंद्राचे उद्घाटन गंगापूर तालुक्याचे आमदार प्रशांत बंब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्रथम येणारे शेतकरी प्रकाश बनकर पिंपरीकर यांचे पहिले मका मोजमाप करण्यात आले. यावेळी आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते या शेतकऱ्याचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळेस खरेदी-विक्री संघाचे सभापती लक्ष्मणराव भुसारे, बाजार समितीच्या सभापती सौ. अर्चनाताई कृष्णा सुकाशे, उपसभापती आप्पासाहेब पाचपुते, सचिन काकडे, सहाय्यक निबंधक नितीन म्हस्के, नायब तहसीलदार मीनल पवार, गोजिरवाल, अमोल कासार, इरफान पटेल, बद्रीनाथ बारहाते, रामेश्वर गवळी, दीपक बडे, उमेश बाराहाते, भाऊसाहेब पदार, प्रताप पवार, नारायण बारहाते, आप्पासाहेब हिवाळे, नारायण बारहाते, नवनाथ सुराशे, सतीश बेडवाल, विजय हिवाळे, रावसाहेब जाधव, किरण खरडे आदीसह अनेक शेतकरी उपस्थित होते.



# महिला हक्क, कायद्यांची जाणीव वाढविणारी कार्यशाळा संपन्न

तभा वृत्तसेवा

**कन्नड, दि.६ जानेवारी :** शहरातील संत तुकाराम महाविद्यालयात महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय महिला कायदेविषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनींना कायद्याची माहिती मिळावी तसेच त्यांच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण व्हावी, या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. रूपाली थोरात व ॲड. विशाल शेजवळ उपस्थित होते. ॲड. रूपाली थोरात यांनी हुंडाबंदी कायदा, स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंधक कायदा,



महिला अत्याचार, छेडछाड, पाठलाग करणे (स्टॉकिंग) आदी महिला विषयक कायद्यांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

ॲड. विशाल शेजवळ यांनी तसेच सायबर गुन्हे, ऑनलाईन फसवणूक, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर यासंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती दिली. सायबर क्राईम म्हणजे काय, सायबर गुन्ह्यांचे प्रकार कोणते आहेत, तसेच अशा गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत सखोल मार्गदर्शन केले. यासोबतच भारतीय दंडविधानातील (खझउ) महत्त्वाच्या तरतुदींची माहिती देऊन विद्यार्थ्यांना कायद्याची मूलभूत ओळख करून दिली.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता देशमुख या होत्या. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी कायद्याची माहिती आत्मसात करून स्वतःच्या हक्कांसाठी सजग व सक्षम बनावे, असे आवाहन केले.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक आयसीसी समितीच्या प्रमुख व महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. सरला गोरे यांनी केले. त्यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट करत समितीमार्फत वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कल्पना देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन अंजली गायकवाड हिने केले. या कार्यशाळेस महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता वाढल्याची प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आली.

## फर्दापूर परिसरातील शेतकरी महावितरण विजेच्या वेळेने त्रस्त

तभा वृत्तसेवा

**फर्दापूर, दि.६ जानेवारी :** फर्दापूर परिसरातील शेतकरी महावितरणच्या विजेच्या लपंडाव आणि रात्री च्या वेळेने शेतकरी मोठ्या संकटात फर्दापूर परिसरातील शेतकरी यांना रात्री १२.३० वाजता महावितरणची शेतकऱ्यांना मिळत असते परंतु तिही कमी दबाची यामुळे शेतकरी यांचा पाणी भरणा हि होत नाही या अजब महावितरणच्या विजेमुळे शेतकरी हा रात्री चा जीव मुठीत घेऊन पिकांना पाणी देण्यासाठी धडपड करत आहे.

या परिसरात सध्या बिबट्या यांचा संचार असल्याने शेतकरी जीव मुठीत घेऊन पिकांना पाणी देत आहे ना थंडी पाहत तसेच बिबट्या ची भिंती याकरिता फर्दापूर परिसरातील शेतकरी यांची अशी मागणी आहे की फक्त आम्हाला आठ तास विज नको फक्त सहा तास द्या तेही उच्च दाबाची लाईट देण्यात यावी जेणेकरून दिवसा पिकांना पाणी देता येईल शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे म्हणतात परंतु त्याला रात्री साडे बारा वाजता लाईट देतात याला सरकार म्हणावं का असे शेतकरी म्हणतात अशा प्रकारे फर्दापूर परिसरातील शेतकरी महावितरणच्या कारभाराला कंटाळून परेशान झाला आहे

# अंगारिका चतुर्थीनिमित्त श्री क्षेत्र राजूर गणपती येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी फराळाची व्यवस्था

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.६ जानेवारी :** सहकाराला सामाजिक कार्याची जोड देऊन सर्वसामान्य घटकांच्या आर्थिक व सामाजिक उत्थानासाठी कार्य करणाऱ्या बुलडाणा अर्बन संस्थेच्या सिल्लोड विभागाच्या विद्यमाने अंगारिका चतुर्थी निमित्त श्री क्षेत्र राजूर गणपती येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी संस्थेच्या स्वमालकीच्या गोदामावर चहा पाण्याची सोय करण्यात आली होती.

दरवर्षी अंगारिका चतुर्थी निमित्त सिल्लोड व परिसरातील नागरिक पायी राजुरेश्वराच्या दर्शनासाठी जातात.संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक, संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुकेश झंवर, बुलडाणा अर्बन चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा कोमलताई झंवर व संस्थेचे सरव्यवस्थापक कैलास कासट यांच्या प्रेरणेने तसेच संस्थेच्या विभाग सिल्लोडचे विभागीय व्यवस्थापक संजय दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी प्रमाणे श्री क्षेत्र राजूर गणपती येथे पायी दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसाठी चहा बिस्किटे व पिण्याच्या पाण्याची सोय संस्थेच्या विभाग सिल्लोड अंतर्गत शाखा सिल्लोड स्वमालकीच्या गोदाम येथे दि.५ सोमवार रोजी करण्यात आले होते. यावेळी हजारो भाविकांची उपस्थिती होती.

यावेळी विभाग सिल्लोड चे विभागीय व्यवस्थापक संजय दळवी, शाखा सिल्लोडचे वरिष्ठ शाखा व्यवस्थापक गजानन झाल्टे लिपिक, कर्मचारी कौतिक कासोद, रुपेश कोरके, गोदाम लिपिक कर्मचारी गणेश सावळे, गणेश चव्हाण, अमित कुळकर्णी तसेच शिपाई कर्मचारी संदीप म्हस्के, दिगंबर पारवे, नंदलाल घुनावत व वाहन चालक मोहन सपकाळ आदी उपस्थित होते.

## कादंबरीचे गडद रहस्य प्रकाशात

**मुंबई :** सोनी सबवरील 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिका सध्या गुपिते, फसवेगिरी आणि निर्णायक क्षणाच्या कथाभागामुळे प्रेक्षकांची उत्कंठा वाढवत आहे. या मालिकेत पुष्पा (करुणा पांडे) या एका असामान्य स्त्रीची कथा सांगितली आहे, जिचा प्रवास एक गृहिणी म्हणून सुरू होऊन आता न्यायासाठी निर्भीडतेने लढणाऱ्या वकिलापर्यंत पोहोचला आहे. सध्या प्रेक्षकांची उत्कंठा आणखीनच वाढली आहे आणि मालिकेत एक मोठे गुपित लवकरच उघडकीस येणार असे दिसत आहे.

# 'क्रांतिज्योती विद्यालय-मराठी माध्यम'ची पहिल्या आठवड्यात ३.९१ कोटींची कमाई

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि.५ जानेवारी :** छत्रपती संभाजीनगर : मराठी शाळेच्या अस्मितेला केंद्रस्थानी ठेवणारा 'क्रांतिज्योती विद्यालय - मराठी माध्यम' हा चित्रपट प्रदर्शित होताच बॉक्स ऑफिसवर मजबूत परफॉर्मन्स देत महाराष्ट्रभर सुपरहिट ठरला आहे. पहिल्याच वीकेंडला या चित्रपटाने ३.९१ कोटींची बंपर कमाई करत यशाची स्पष्ट बेंचमार्क सेट केली आहे. राज्यातील प्रमुख शहरांसह ग्रामीण भागातही चित्रपटगृहांमध्ये हाऊसफुल फलक लागले असून, प्रेक्षकांचा प्रतिसाद सातत्याने अपट्रेंडमध्ये आहे.




मराठी शाळेच्या आठवणी, भावनिक नाते आणि वास्तववादी मांडणी यामुळे चित्रपटाने सर्व वयोगटांमध्ये स्ट्राँग कनेक्ट निर्माण केला आहे. आशयघन कथा, प्रभावी संवाद, कलाकारांचा नैसर्गिक अभिनय आणि मराठी मातीचा ठळक ठसा यामुळे हा चित्रपट केवळ मनोरंजन न राहता एक भावनिक अनुभव ठरत आहे. सोशल मीडियावर तसेच बुक माय शोवर चित्रपट ट्रेंडिंग असून समीक्षकांकडूनही सकारात्मक रिव्ह्यूज मिळत आहेत.

या यशाचे श्रेय दिग्दर्शक हेमंत ढोमे यांच्या संवेदनशील दिग्दर्शनाला जात असून, प्रेक्षकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. चित्रपटात सचिन खेडेकर, अमेय वाघ, सिद्धार्थ चांदेकर, क्षिती जोग, निर्मिती सावंत, पुष्कराज चिरपुटकर, प्राजक्ता कोळी यांसह दमदार स्टारकास्ट आहे. चलचित्र मंडळी निर्मित आणि हेमंत ढोमे लिखित-दिग्दर्शित हा चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीतील एक महत्त्वपूर्ण माईलस्टोन ठरत आहे.

## प्रस्तावित वाळुज महानगर न्यायालयाच्या स्थापनेस विरोध

तभा वृत्तसेवा

**गंगापूर, दि.६ जानेवारी :** गंगापूर तालुका वकील संघाकडून जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांना दिलेल्या पत्राद्वारे प्रस्तावित वाळूज महानगर न्यायालयाच्या स्थापनेस विरोध म्हणून गंगापूर वकील संघाकडून आज ०६/०१/२०२६ रोजी न्यायालयीन कामकाजातुन (पेन डाऊन) अलिप्त राहणे आंदोलन करण्यात येत आहे.

याविषयी अधिक माहिती अशी की,वाळुज महानगर/वाळुज न्यायालय स्थापनेबाबत गंगापुर तालुक्यातील विधिज्ञांना तसेच गंगापुर शहर व तालुक्यातील नागरीकांना विश्वासात न घेता तसेच परस्पर निर्णय घेऊन वाळुज महानगर येथे प्रस्तावित न्यायालय स्थापनेचा अन्यायकारक निर्णय प्रक्रीया चालु आहे. सदरील प्रक्रीया ही अन्यायकारक असून गंगापुर वकील संघ तसेच तालुक्यातील नागरीकांचे गैरसोय व हेळसांड करणारे असल्याने त्याच्या निषेधार्थ म्हणुन दिनांक ०६/०१/२०२६ रोजी न्यायालयीन कामकाजापासुन एक दिवस अलिप्त राहण्याचा ठराव पारीत केला आहे. त्यानुसार जिल्हा वकील संघ गंगापुर दिनांक०६/०१/२०२६ रोजी न्यायालयीन कामकाजापासून अलिप्त राहणार आहे असे पत्र गंगापूर वकील संघाचे अध्यक्ष ड के. आर. कऱ्हाळे वकील संघ गंगापूर चे सचिव ॲड. व्ही.एस. काळे पाटील यांनी दिले आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ०६/२०२६

१)मनोज श्रिलाल अग्रवाल, वय ५१ वर्षे, धंदा मजुरी, रा.जामठी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर ह. मु. नवनाथ नगर, छत्रपती संभाजीनगर, २)प्रकाश श्रिलाल अग्रवाल, वय ६० वर्षे, धंदा मजुरी, रा.जामठी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर ह. मु. पुंडलीकनगर, छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी ड. स्वप्निल र. सुरळकर, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत ताराबाई श्रिलाल अग्रवाल यांचा दिनांक २९/११/२०१२ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यू झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते २ हे त्यांना वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते २ हे मयत ताराबाई श्रिलाल अग्रवाल यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आज रोजी दिनांक ०६/०१/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १८/०२/२०२६.

**विभीगीय लिपीक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)**
**प्रतिलीपी :-**
**१) नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.**
**२) ग्रामपंचायत जामठी, सोयगांव जि. औरंगाबाद.**

## अग्रलेख...

# भाबडे भाषक भान

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे दुसरे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्यात संपन्न झाले. साताऱ्याचे संमेलन ९९ वे होते. आता शंभरावे संमेलन पुण्यात होणार आहे. शेकडो वर्षे जुनी भाषा, तितकाच जुना साहित्य व्यवहार आणि १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची घोषणा या पृष्ठभूमीवर आपल्या माय मराठीच्या सद्य:स्थितीच्या संदर्भात वास्तववादी चिकित्सा करणे आवश्यक ठरते. यातील सर्वांत पहिला मुद्दा मराठी भाषेच्या भविष्याबद्दल आणि त्या भाषेतील विविध साहित्य प्रवाहांबद्दलच्या गळेकाढूपणाचा. आपली संमेलने, मग अखिल भारतीय असोत किंवा जिल्हा स्तरावरची असोत, ती गळेकाढूपणासाठी प्रसिद्ध आहेत. साताऱ्यातही तेच झाले. गर्दी चांगली होती. ग्रंथ विक्री चांगली झाली. पण, बव्हंशी सूर हा विविध विषयांवर चिंता व्यक्त करणारा. नपेक्षा ठरावांमध्ये काही चांगल्या बाबी आहेत. भाषेची सक्ती, मराठी माध्यमाच्या शाळा बंद करण्याचा विषय, महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील ८६५ गावांचा प्रश्न, ग्रंथपालांची पदे असे मुद्दे ठरावांमध्ये घेतले गेले हे छानच. परंतु, एकुणात आपली भाषक समज आणि भान हे भाबडे आणि भावनिक असल्याचेच पुन: एकवार अधोरेखित झाले. राज्यातील प्रत्येक बसस्थानक आणि नगरपालिकेत पुस्तकाच्या दुकानांना सवलतीची जागा देऊ वगैरे घोषणा झाल्या. त्यातून फार काही हाती पडणारे नाही हे आजच स्पष्ट आहे. आपण हुतात्म्यांची स्मारके केली, समाजभवने केली. त्यातून फार काही हाती लागले नाही. आता मराठीला अभिजात दर्जा प्राप्त झाल्याच्या पृष्ठभूमीवर तिला व्यवहार भाषा आणि ज्ञानभाषा बनवण्याच्या दृष्टीने ठोस कृती कार्यक्रमही हाती घेतला गेलेला दिसत नाही. खरी चिंता व्यक्त करावी तो विषय हाच.

जगात सात हजारावर भाषा बोलल्या जातात. चिनी-मँडेरिन, इंग्रजी, हिंदी, स्पॅनिश, अरबी या त्यातील प्रमुख भाषा. पाच ते दहा कोटी लोक ज्या भाषा बोलतात, त्या भाषांत मराठीचा समावेश आहे. तेलगू आणि तामिळ भाषाही त्यात आहे. त्यामुळे मराठी भाषा विलुप्त वगैरे होईल, अशी भीती व्यक्त करणे अनाठायी आहे. कोट्यवधी लोक जी भाषा बोलतात, ज्या भाषेत व्यवहार करतात, ज्या भाषेत मोठ्या प्रमाणात लेखन-वाचन-अध्ययन-अध्यापन होते, ती भाषा विलुप्त होण्याची शक्यताच नाही. खरा प्रश्न आहे तो असा की, मराठी भाषेला महाराष्ट्रात सार्वत्रिक स्वरूपात व्यवहार भाषेचा दर्जा मिळण्याचा. सरकारी कामकाजात मराठीला बऱ्यापैकी प्रतिष्ठा आहे. तशी ती व्यवसाय-उद्योग-कॉर्पोरेट जगतात नाही. भाषांच्या बाबतीत असे म्हटले जाते की, एखाद्या भाषेला ज्ञानभाषा, लोकभाषा किंवा व्यवहार भाषा बनविण्यासाठी तीन गोष्टी महत्त्वाच्या असतात. पहिली म्हणजे ती भाषा शासन-प्रशासनाची असली पाहिजे. दुसरी बाब म्हणजे व्यापार-उदिम त्या भाषेत चालला पाहिजे आणि तिसरे म्हणजे सैन्यदलात त्या भाषेचा वापर होत असला पाहिजे. मराठी यातील फक्त एक अट पूर्ण करते आणि ती म्हणजे शासन-प्रशासनातील वापराची. सैन्यदलात मराठीचा वापर व्हावा, असा विचार करण्याचे कारण नाही. पण, व्यापार-व्यवसायाची व्यवहार भाषा म्हणून तिला प्रतिष्ठा देण्याचा प्रयत्न जरूर झाला पाहिजे. त्यासाठीची पूर्वअट अशी की, मराठी ही ज्ञानभाषा झाली पाहिजे. मराठी ही प्राथमिक स्तरावर ज्ञानभाषा आहे काय, या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी आहे. परंतु, त्यापुढे किंवा उच्च शिक्षणाच्या प्रक्रियेत तिच्याविना कुणाचे अडते काय, या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी आहे. कितीही विद्यापीठे आणि मंडळे-महामंडळे केली तरी ती ज्ञानभाषा बनू शकत नाही. त्याची कारणे अनेक आहेत. मराठीत आजही अद्ययावत ज्ञानकोश निघत नाहीत. अद्ययावत शब्दकोश निघत नाहीत. जे छापून तयार झालेले आहेत, त्यातील बरेच जुने झाले आहेत. त्यांचे 'अपडेशन' अपेक्षेप्रमाणे होताना दिसत नाही. साध्या गॅझेटियर्सचे उदाहरण घ्या. इंग्रजांनी तयार केलेले गॅझेटियर्स आजही संदर्भासाठी वापरले जातात. त्यातील सर्व नोंदी स्वातंत्र्यपूर्व काळातील आहेत. त्यानंतर मराठीत काही प्रमाणात गॅझेटियर्स झाले, पण त्यांचेही अद्ययावतीकरण गरजेनुसार होताना दिसत नाही. या साऱ्यांहून पुढचा आणि सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे तो ज्ञानभाषा बनण्यासाठी अन्य भाषांतील ज्ञान मराठीत येण्याचा. त्या बाबतीत सगळाच आनंदी-आनंद आहे. किमान एका शाखेचे पूर्ण अद्ययावत ज्ञान, अगदी उच्च शिक्षणाच्या स्तरापर्यंत, मराठीतून देण्याची तयारी अद्याप झालेली नाही. आम्ही मराठीतून वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरू करू, हे घोषणेसाठी ठीक वाटते. प्रत्यक्षात ते करण्यात बऱ्याच अडचणी आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे. पण, भाषेच्या बाबतीतील भावनिकता असा विचार करू देत नाही. या संदर्भात दोन्ही बाजूंनी अडचणी आहेत. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात एमबीबीएसचा अभ्यासक्रम मराठीतून सुरू करायचे ठरले तर त्यासाठी पाठ्यपुस्तके किंवा संदर्भग्रंथ मराठीतून उपलब्ध आहेत काय?... आणि समजा तशी ती तयार केली गेली तर मराठी माध्यमातून एमबीबीएस झालेली व्यक्ती तेलंगणा किंवा ओडिशात प्रॅक्टिस करू शकेल काय?... या दोन्ही प्रश्नांची उत्तरे दिल्याखेरीज वैद्यकीयच काय, कोणत्याच शाखेचा अभ्यासक्रम मराठीतून सुरू करण्याचा विचार करता येत नाही. या अडचणी व्यावहारिक आहेत. तेथे भावनिक उमाळा कामाचा नाही. भाबडेपणा उपयोगाचा नाही.

मराठी भाषा अतिशय समृद्ध आहे. तिच्या साहित्य व्यवहाराला मोठी परंपरा आहे. दरवर्षी अखिल भारतीय स्तरावरील भव्य साहित्य संमेलन भरविणारी ही एकमेव भाषा. त्यामुळे ती सशक्त भाषा आहे, यात वाद नाही. ती अधिक व्यापक व्हायची असेल तर आपल्याला भाषेच्या बाबतीतील भावनिकता आणि भाबडेपणा बाजूला ठेवावा लागेल. अन्य भाषांतून येणारे शब्द सामावून घेतले जातात तेव्हा भाषा समृद्ध होते. इंग्रजीचे उदाहरण त्यासाठी नेहमीच दिले जाते. जगातील सर्व प्रमुख भाषांतील शब्द इंग्रजीने आपलेसे केलेले आहेत. वर्ष-दोन वर्षांत इंग्रजीचा अद्ययावत शब्दकोश येतो. परभाषांतील शब्द सामावून घेतो. ते परके शब्द इतके इंग्रजाळतात की त्यांच्यावरील परभाषेची छाप पूर्णपणे निघून जाते. मराठीबद्दलच्या आपल्या आस्थेत भावनिकता मोठी. त्यामुळे अन्य भाषांतील शब्दांचा वापर जरासा झाला तरी भाषा भ्रष्ट झाल्याचा किंवा होत असल्याचा कल्ला करणारे लोक आहेत. भाषा हा संस्कृतीचा अविभाज्य भाग असेल तर तो कधीही साचेबद्ध राहता कामा नये. संस्कृती ही सदैव प्रवाहित असते. तशी भाषा देखील प्रवाही असली पाहिजे. परिवर्तनशील असली पाहिजे. तिच्यात नवे शब्द आले पाहिजेत. तिच्या अभिजात कृती अन्य भाषांत गेल्या पाहिजेत आणि अन्य भाषांतील उत्तमोत्तम रचना आपल्या भाषेत आल्या पाहिजेत.

वाचन संस्कृती हा यानंतरचा मुद्दा. लोक अजूनही वाचतात. पुस्तकांचे खप कमी झाले आहेत, पण लोक स्क्रीनवर वाचतात. या विषयावर वेगळे लिहिता येईल. लिहिणाऱ्यांची आणि वाचणाऱ्यांची संख्या नेहमीच कमी असते. शिवाय, पूर्वी पुस्तकाचे वाचन हा त्यातल्या त्यात एकमेव विरंगुळा होता. आता विरंगुळ्याची अनेक साधने आहेत. नव्या काळातील विषयांचे पुस्तक इतर भाषेतून आपल्या भाषेत अनुवादित झाले असले तरी ते आवर्जून वाचले जाते की नाही? मग मूळ मराठीतून तसे कां लिहिले जात नाही? याचे कारणही पुन्हा आपण स्वत:भोवती घालून घेतलेल्या भाषक वर्तुळाच्या व्याप्तीत दडलेले आहे. एकुणात मराठी भाषेचा साहित्य व्यवहार हा त्यातील 'स्टेकहोल्डर्स'मुळे बंदिस्त आणि मर्यादित राहिलेला आहे आणि त्यामागे आपली भाषक समज अतिशय भाबडी आणि भावनिक असणे हेच महत्त्वाचे कारण आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सुपर इंटेलिजन्सच्या वाढत्या प्रभावाच्या पृष्ठभूमीवर होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात यादृष्टीने मंथन, चिंतन व्हावे आणि मराठीला ज्ञानभाषा व व्यवहार भाषा बनविण्यासाठी आवश्यक तो कृती कार्यक्रम जाहीर व्हावा, हीच अपेक्षा.

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# मित्र देश कसे झाले शत्रू?

आखाती प्रदेशातील स्पर्धा ही मुस्लिम देशांचे खलिफा बनण्याची शर्यत आहे. सुरक्षा असो, तेल असो, राजनय असो किंवा प्रादेशिक राजकारण; सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती (यूएई) हे दोघेही प्रत्येक आघाडीवर एकत्र काम करायचे; परंतु गेल्या काही वर्षांमध्ये परिस्थिती बदलली आहे. त्यांच्यातील अविश्वासाची दरी इतकी रुंदावली, की आज शत्रुत्वात बदलली आहे. आता येमेन मुद्यावरून सौदी अरेबिया आणि यूएईमध्ये तणाव वाढला आहे. सौदी अरेबिया आणि यूएईमध्ये येमेनच्या भूमीवर संघर्ष सुरू झाला आहे. सौदी अरेबियाने येमेनमध्ये यूएईच्या मालकीच्या शस्त्रास्त्रांच्या मालवाहतुकीवर हवाई हल्ला केला. यामुळे सौदी अरेबिया आणि यूएईमधील संबंध ताणले गेले. सौदी सैन्याने येमेनमधील मुकाल्ला या दक्षिणेकडील बंदरावर वारंवार बॉम्बहल्ला केला. त्यामुळे दोन्ही देशांमधील तणाव वाढला. परिस्थिती इतकी बिकट झाली की येमेनमधील सौदी समर्थित सरकारने यूएईच्या सैन्याला देश सोडण्यासाठी २४ तासांचा अल्टिमेटम दिला. त्यानंतर, यूएईनेही घाईघाईने आपले उर्वरित सैन्य मागे घेतले. त्यांच्या संरक्षण मंत्रालयाने एक निवेदन जारी केले, की ते येमेनमधील आपली उर्वरित लष्करी उपस्थिती संपवेल. इतिहासात मागे वळून पाहिले, तर लक्षात येईल की दोन्ही देशांमधील शत्रुत्व नवीन नाही. दोघे चांगले मित्र राहिले आहेत. अनेकदा आखाती देशांमध्ये या दोन्ही देशांमधील मैत्रीचे दाखले जात होते; परंतु काही हितसंबंधांमुळे ही मैत्री आता शत्रुत्वात बदलली आहे. सौदी अरेबिया आणि यूएई हे आखाती प्रदेशातील दोन प्रमुख मुस्लिम देश एके काळी घनिष्ठ मित्र होते. त्यांनी अरब जनांदोलनांपासून येमेन युद्धापर्यंत अनेक कारवायांप्रसंगी एकत्र काम केले; पण आता परिस्थिती बदलली आहे.

आर्थिक स्पर्धा, प्रादेशिक प्रभाव आणि वेगवेगळ्या रणनीतींमुळे त्यांना शत्रू बनवले आहे. ही कहाणी शतकानुशतके जुन्या संबंधांपासून सुरू होते आणि आजच्या भू-राजकीय तणावापर्यंत पोहोचते. सौदी अरेबिया सुरुवातीपासूनच यूएईचा समर्थक होता. दोन्ही देश सुन्नी मुस्लिमबहुल राजेशाही आहेत. दोघांची अर्थव्यवस्था तेलावर अवलंबून आहे. आखातातील इराणच्या वाढत्या प्रभावाबद्दलची चिंता आणि आखाती प्रदेशात स्थैर्य राखण्याचे सामायिक ध्येय यामुळे त्यांना जवळ आणले गेले होते. दोघांमधील दीर्घकालीन मैत्रीमध्ये इराण हा एक घटक आहे. दोन्ही देशांची मैत्री २०१० च्या दशकाच्या सुरुवातीला घट्ट झाली. क्राऊन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान (एमबीएस) आणि यूएईचे शासक मोहम्मद बिन झायेद (एमबीझेड) यांनी आपले वैयक्तिक संबंध मजबूत केले. ते इस्लामिक कट्टरतावाद आणि इराणविरुद्ध एकत्र आले. तथापि, हळूहळू तेढ निर्माण झाली. सौदी अरेबिया आणि यूएई हे आखाती प्रदेशात सुरक्षेचे दोन मजबूत आधारस्तंभ मानले जात. २०११ मध्ये जेव्हा अरब स्प्रिंग क्रांतीला वेग आला, तेव्हा त्यांनी येमेनमध्ये इराण समर्थित हौथींविरुद्ध युती स्थापन केली. अरब स्प्रिंग क्रांतीने मध्य पूर्वेतील राजकारणाला हादरवून टाकले. इजिप्तमधील जनरल सिसी यांच्या सरकारला पाठिंबा देणे असो किंवा लिबिया आणि येमेनमध्ये हस्तक्षेप करणे; दोन्ही देशांनी एकत्र रणनीती आखली. त्यांची जोडी 'अरब जगाचे जुळे स्तंभ' म्हणून ओळखली जाऊ लागली.



२०११ मध्ये, यूएई आणि सौदी अरेबियाने इस्लामी चळवळींविरुद्ध संयुक्त आघाडी स्थापन केली. त्यांनी बहरीनमधील उठाव दडपण्यासाठी संयुक्त सैन्य पाठवले आणि २०१३ मध्ये इजिप्तमधील मुस्लिम ब्रदरहूड सरकारच्या लष्करी हकालपट्टीसाठी सहकार्य केले. मार्च २०१५ मध्ये दोन्ही देशांनी हुथी बंडखोरांविरुद्ध लष्करी मोहीम सुरू केली. यूएईने सैन्य पुरवले, तर सौदी अरेबियाने हवाई शक्ती पुरवली. तथापि, २०१९ मध्ये यूएईने आपले सैन्य मागे घेतले आणि दक्षिणी फुटीरतावाद्यांना (एसटीसी) पाठिंबा दिला, तर सौदी अरेबिया येमेनी सरकारसोबत राहिला. हा पहिला मोठा वाद होता. जून २०१७ मध्ये दोन्ही देशांनी कतारवर दहशतवादाला पाठिंबा देण्याचा आरोप करत बहिष्कार टाकला. २०२१ च्या 'अल-उला' शिखर परिषदेत सौदी अरेबियाने कतारशी समेट केला, तर यूएईने सौम्य भूमिका घेतली. सप्टेंबर २०२० मध्ये यूएईने इस्रायलशी संबंध सामान्य केले; परंतु सौदी अरेबिया पॅलेस्टिनी राज्याच्या मागणीवर ठाम राहिला. २०२२ मध्ये यूएई-इस्रायल व्यापार २.५ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला; परंतु सौदी अरेबियाने त्यापासून स्वत:ला दूर केले. असे म्हटले जाते की सौदी अरेबियाचे इस्रायलशी असलेले शत्रुत्व आणि यूएईची इस्रायलशी असलेली जवळीक हे शत्रुत्वाचे एक प्रमुख घटक होते.

जुलै २०२१ मध्ये यूएईने 'ओपीईसी'मध्ये सौदी अरेबियाच्या नेतृत्वाखालील उत्पादन कपात रोखली आणि आपल्या बेसलाईनमध्ये वाढ करण्याची मागणी केली. फेब्रुवारीमध्ये सौदी अरेबियाने परदेशी कंपन्यांना रियाधमध्ये मुख्यालय स्थापन करण्यास सांगितले आणि दुबईला आव्हान दिले. जुलैमध्ये सौदी अरेबियाने संयुक्त अरब अमिरात मुक्त क्षेत्रांमधून आयातीवरील शुल्क उठवण्यास नकार दिला. सुदानी गृहयुद्ध एप्रिल २०२३ मध्ये सुरू झाले. या वेळी यूएईने 'रॅपिड सपोर्ट फोर्सेस'ला शस्त्रे पुरवली, तर सौदी अरेबियाने सुदानी सशस्त्र दलांना पाठिंबा दिला आणि युद्धबंदी चर्चा आयोजित केली. डिसेंबर २०२४ मध्ये सीरियामध्ये असद यांना पदच्युत करण्यात आले. दोन्ही बाजूंनी नवीन नेतृत्वाशी संपर्क साधला; परंतु यूएईने असद यांच्यावर टीका केली. येमेनमध्ये याच महिन्यात यूएई समर्थित 'एसटीसी'ने सौदी अरेबियाची 'लाल रेषा' ओलांडून हद्रामौत तेलक्षेत्रे ताब्यात घेतली. सौदी जेट आणि यूएई यांच्यात शत्रुत्व सुरू झाले. शत्रुत्वाचा मुख्य स्रोत येमेनमधील मुकाला हे दक्षिणेकडील बंदर होते. सौदीच्या नेतृत्वाखालील युतीने मुकाल्ला बंदरावर हवाई हल्ला केला.

सौदी अरेबियाने स्पष्टपणे सांगितले की, हा हल्ला यूएईच्या शस्त्रास्त्रांच्या मालवाहतुकीला लक्ष्य करत होता. तथापि, यूएईने सौदी अरेबियाचे दावे फेटाळून लावले आणि म्हटले की हल्ला केलेल्या मालवाहतुकीत शस्त्रे नव्हती, तर यूएईच्या लष्करासाठी पुरवठा आणि उपकरणे होती. या महिन्याच्या सुरुवातीपासूनच सौदी अरेबिया आणि यूएई या आखाती देशांमधील तणाव सातत्याने वाढत आहे. यूएईने केलेल्या घोषणेमुळे हा तणाव कमी होत असल्याची अटकळ निर्माण झाली. असे असूनही, दोन्ही देशांच्या भू-राजकीय महत्त्वाकांक्षांमधील संघर्ष अधिकाधिक स्पष्ट होत आहे. संयुक्त अरब अमिरातीच्या संरक्षण मंत्रालयाने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की ते येमेनमधून आपली उर्वरित लष्करी उपस्थिती मागे घेईल. आम्ही २०१५ पासून अरब युतीचा भाग आहोत आणि येमेनमधील कायदेशीर सरकारला पाठिंबा देत आहोत. संयुक्त अरब अमिरातीच्या सैन्याने २०१९ मध्ये येमेनमधील आपले मुख्य लष्करी ऑपरेशन पूर्ण केले आणि परतले; परंतु अतिरेकी शक्तींना रोखण्यासाठी काही सैन्य मागे ठेवण्यात आले होते. तथापि, अलिकडच्या घडामोडींच्या पृष्ठभूमीवर, संरक्षण मंत्रालय उर्वरित सैन्य मागे घेण्याचे आवाहन करत आहे. हा तात्पुरता शह असला, तरी गेल्या दशकभरातील शत्रुत्व पाहता या दोन देशांमधील संघर्ष संपण्याची शक्यता कमीच आहे.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# बांगलादेशची मान मोदींच्या हातात

बांगलादेशच्या जन्मापासून कधी नव्हे एवढे संबंध भारताशी ताणले गेले आहेत. त्यास कारणीभूतही स्वत: बांगलादेश असून, त्याने स्वत:च पायावर कुऱ्हाड मारून घेतली आहे. भारताशिवाय पर्याय नसतानाही बांगलादेशच्या सध्याच्या नेतृत्वाने हा आत्मघाती पर्याय निवडला आहे. मागील एका महिन्यामध्ये तीन हिंदूंच्या हत्या करण्यात आल्या. तेथील हिंदूंचा अतोनात छळ अजूनही सुरू आहे. बांगलादेशात नवीन उदयास आलेले पक्ष भारतविरोधी गरळ ओकत आहे. भारताची सात पूर्वोत्तर राज्ये आम्ही तोडून भारताचे तुकडे पाडू. भारताला धडा शिकवू अशा प्रकारच्या घोषणा सध्या बांगलादेशमधील अनेक नेते देत आहेत. तेथील अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूसही बाहेर देशामध्ये जाऊन भारतविरोधी गरळ ओकण्यात सध्या आघाडीवर आहेत. त्यामुळे या देशाबद्दल भारतानेही आपल्या धोरणामध्ये बदल करून धडा शिकविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

चीनमध्ये जाऊन युनूस यांनी चीनला पूर्वोत्तरमध्ये येण्याचे आमंत्रण दिले. अशा प्रकारे भारताला डिवचण्यासाठी युनूस आणि तेथील नेते सध्या टपून बसले आहेत. असे असले तरी बांगलादेशची मान सध्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातामध्ये असून, ती नरेंद्र मोदी यांनी आवळली तर बांगलादेशमध्ये हाहाकार माजल्याशिवाय राहणार नाही. बांगलादेशात वाहणाऱ्या सर्व नद्या भारतामधून जातात. त्यामधील सर्वाधिक महत्त्वाची नदी म्हणजे गंगा आहे. या गंगा नदीच्या मुख्य प्रवाहाने बांगलादेशमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यास पद्माच्या नावाने ओळखले जाते. भारत आणि बांगलादेश यांच्यामध्ये १२ डिसेंबर १९९६ साली गंगा नदी पाणी करार झाला होता. तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना आणि भारताचे पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांनी या करारावर स्वाक्षरी केली होती. हा करार ३० वर्षांसाठी असल्याने या कराराची मुदत यावर्षी डिसेंबर महिन्यामध्ये संपत आहे. त्यामुळे बांगलादेशच्या जर मुसक्या आवळायच्या असतील तर भारताने हा संपूर्ण करार रद्द करून बांगलादेशमध्ये जाणारे गंगेचे पाणी स्वत:साठी राखीव ठेवायला हवे. या करारानुसार भारत दरवर्षी बांगलादेशला जवळपास ३५ हजार क्यूसेस पाणी देतो. या पाण्यावरच बांगलादेशची तहान भागविली जाते. या व्यतिरिक्त ब्रह्मपुत्र आणि मेघना या दोन प्रमुख नद्यांचा प्रवाहही भारतातूनच बांगलादेशात जातो. त्यामुळे बांगलादेशने कितीही उड्या मारल्या, कितीही वल्गना केल्या तरी त्यांच्या मुसक्या आवळण्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एक निर्णय पुरेसा आहे. १९७१ पासून भारताने बांगलादेशसोबत सदैव मैत्रीचा हात पुढे करून त्यास मदतच केली आहे. त्या मदतीची परतफेड जर शत्रुत्वाने होत असेल तर भारतानेही गंभीरतेने या बाबीचा विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. पहलगामच्या अतिरेकी हल्ल्यानंतर पाकिस्तानसोबतचा पाणी करार पूर्णपणे रद्द करून भारताने पाकिस्तानला त्याची जागा दाखवून दिली. त्यामुळे मोहम्मद युनूस यांच्या काळजाचे ठोके वाढायला सुरुवात झाली आहे. नरेंद्र मोदी आपणासही पाकिस्तानसारखा दणका देईल की काय या भीतीने त्यांची झोप उडाली आहे. त्यामुळे त्यांना हा करार करण्याची घाई झाल्याचे दिसून येत आहे. २०१४ नंतर इच्छाशक्ती दृढ असलेला नवीन भारत साऱ्या जगाने बघितला आहे. केंद्र सरकारचे धोरण बघता हा करार यापुढे होणार नाही, असा विश्वास जनतेला आहे. नरेंद्र मोदी यांच्या कूटनीतीने पाकिस्तानची संपूर्ण जगामध्ये नाचक्की झाली आहे. बांगलादेशची वाटचालही त्याच दिशेने सुरू आहे. या होणाऱ्या उलथापालथीने काँग्रेसच्या युवराजांना बांगलादेशचा उमाळा येऊन ते नरेंद्र मोदी यांना घेरून पुन्हा एकदा बदनाम करण्याचा प्रयत्न नक्कीच करतील. भारतातील जनतेने काँग्रेसला नाकारल्यामुळे त्यांच्या सर्व आशाआकांक्षा विदेशाकडे लागल्या आहेत. सत्तेसाठी विदेशामध्ये जाऊन खटाटोप करणे हा सध्या त्यांचा एकमेव आवडता कार्यक्रम आहे. परंतु, विचलित न होता राष्ट्र प्रथम या भावनेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दिशा ठरलेली आहे. जनतेच्या मनामध्ये काय आहे, हे ते पक्के जाणून आहे. त्यामुळे बांगलादेशही वठणवीवर येण्यास फार काळ लागणार नाही, एवढे मात्र नक्की.



९८८१७१७८५६

## इतस्तत:

**दत्तात्रेय आंबुलकर**

# नववर्षात भारताची गगनभरारी!

भारताच्या या यशस्वी अंतराळ अभियानाची पृष्ठभूमी म्हणजे, २०२५ मध्ये विविध टप्प्यांवर भारताने आपल्या यशाची छाप पाडली आहे. याचे श्रेय सर्वस्वी इस्रो व इस्रोअंतर्गत बंगळुरू, अहमदाबाद, त्रिवेंद्रम येथील संशोधक-अभ्यासक व त्यांचे मार्गदर्शक यांचे असून, केंद्र सरकारच्या नियोजन-प्रोत्साहनाचासुद्धा त्यामध्ये महत्त्वाचा वाटा आहे. याआधीच्या दशकांमध्ये भारताच्या अंतरिक्ष धोरण आणि मोहिमेला अभियांत्रिकी-तंत्रज्ञान व अंतराळ विज्ञानाची जोड मिळत होती. या मूलभूत तंत्रज्ञान व अभियांत्रिकीला भारतीय संशोधकांच्या अभ्यासपूर्ण प्रयत्नांची जोड मिळत गेली. यातूनच चांद्रयान, मंगळयान, आदित्य एल-१ यांसारख्या मोहिमांचे यशस्वीपणे क्रियान्वयन झाले. याच यशाचा पुढचा टप्पा म्हणून आता २०२५ मध्ये भारतीय अंतराळ अभियानाला सर्वाधिक पाठबळ देण्यासाठी न्यू स्पेस इंडिया लिमिटेडची स्थापना करण्यात आली. भारतीय अंतराळ संशोधन क्षेत्रात हा एक महत्त्वाचा व निर्णायक टप्पा ठरणार आहे.

नवीन वर्ष २०२६च्या पहिल्या टप्प्यातच भारताने आपल्या अंतराळ संशोधन क्षेत्रात महत्त्वाच्या अशा सहा प्रक्षेपण प्रकल्पांची सिद्धता केली आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. यामध्ये न्यू स्पेस इंडिया लिमिटेडचे अंतराळ प्रक्षेपण-संशोधनासाठी आवश्यक असे माहिती-तंत्रज्ञान, मूलभूत सुविधा, पायाभूत रचना इ.सह प्रत्यक्ष सहकार्य व मार्गदर्शन लाभणार आहे. याचे मोठे व सकारात्मक परिणाम निश्चितपणे होणार आहेत.

अंतराळात भारत आणि भारतीयांचे केवळ पदार्पणच पुरेसे. आपले बस्तान बसविण्यासाठी इस्रोला अंतराळ सुरक्षा व प्रगत तंत्रज्ञानासह आपले प्रयत्न आणि तयारी यशस्वीपणे सिद्ध करावी लागेल. त्यादृष्टीने इस्रोचे प्रयत्न आणि नियोजनदेखील सुरू आहे. या तयारीमध्ये मानवरहित संशोधन यानापासून अंतराळयानातून भारतीय शास्त्रज्ञांना अंतराळात सुरक्षितपणे पाठविणे व त्यानंतरही त्यांच्या सुरक्षिततेची निश्चिती करणे आवश्यक आहे. यासाठी इस्रोतर्फे अंतराळात मानवीय सुरक्षेसाठी आवश्यक प्रयत्नांना चालना देण्यात आली असून, या प्रयत्नांना अधिक गतिमान करणे आवश्यक आहे.

याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून नवीन वर्षाच्या पहिल्या टप्प्यात इस्रोतर्फे प्रायोगिक स्तरावर मानवासह असणारे गगनयान अंतराळात पाठविण्यात येणार असून, त्याद्वारे अंतराळात मानवीय सुरक्षेच्या चाचणीची पडताळणी केली जाणार आहे. या प्रस्तावित प्रयोगाकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. इस्रोच्या पुढील अंतराळ मोहिमांच्या यशाचा पूर्व-टप्पा म्हणून हे प्रयत्न निर्णायक ठरणार आहेत. या चाचणीदरम्यान मानवीय जीवनासाठी आवश्यक अशा प्राणवायू, पर्यावरण, तापमान इ. महत्त्वपूर्ण बाबींची पूर्तता यानिमित्ताने होणार आहे.




मानवसहित अंतराळयान अंतराळात यशस्वीपणे पाठवून ते स्थिरावण्यासाठी व या प्रयोगाच्या यशस्वितेची पडताळणीच नव्हे, तर खातरजमा करण्यासाठी विविध प्रकारची परिस्थिती आणि बदलते वातावरण इ. कठीण परिस्थितीवर मात करण्यासाठी विविध प्रकारच्या कठोर चाचण्या घेण्यात येणार आहेत. हे याआधीच इस्रोच्या उच्चपदस्थांतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. अंतराळातील प्रक्षेपणाशी संबंधित चाचणीच्या पुढच्या टप्प्यात प्रत्यक्ष अंतराळात पोहोचल्यावर संशोधक-मानवाचे यानातून बाहेर जाणे, त्यांचा अंतराळातील वावर व मुख्य म्हणजे यानामधील फेरप्रवेश इ. टप्प्यांच्या काळजीपूर्वक अभ्यास-चाचण्या करण्यात येणार आहेत. त्यादरम्यान पण अर्थातच, संशोधक आणि यान या उभयतांच्या सुरक्षेला विशेष महत्त्व दिले जाणार आहे. इस्रोच्या दृष्टीने अभियानाशी संबंधित पुढचा व महत्त्वाचा टप्पा म्हणजे, अंतराळ मोहीम आटोपून यानाचा पृथ्वीकडचा परतीचा प्रवास. यादरम्यान, परतताना चांद्रयान पृथ्वीच्या पर्यावरणीय कक्षेमध्ये प्रवेश करताना विज्ञान-तंत्रज्ञानच नव्हे, तर पर्यावरणीयसंदर्भात विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. या विविध टप्प्यांमधील असणारी जोखीम, त्याचे होऊ शकणारे संभाव्य परिणाम व या जोखमींवर घ्यावयाची काळजी, यावर इस्रोचा विशेष भर राहणार आहे. या संदर्भात अंतराळ तंत्रज्ञानाच्या जोडीलाच अद्ययावत माहिती-तंत्रज्ञानाची साथही तितकीच महत्त्वाची. मुख्य म्हणजे, संपूर्णपणे व सुरुवातीपासून मोहिमेच्या परतीच्या अखेरच्या यशस्वी क्षणापर्यंतच्या संदर्भातील जोखीम व्यवस्थापन आखून त्यासाठी आवश्यक ते सर्वप्रकारचे नियोजन करण्यात येत आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. यासाठी आपात्प्रसंगी वापरण्यासाठी आवश्यक अशा विशेष व अद्ययावत पॅराशूटची संशोधन-निर्मिती करण्यात येत आहे. इस्रोच्या नव्या व आव्हानात्मक अंतराळ गगनभरारीला संरक्षण सिद्धतेच्या दृष्टीने सर्व संबंधित सुरक्षा यंत्रणांनासुद्धा त्याचदरम्यान सिद्ध ठेवण्यात येणार आहे. यासंदर्भात मोहिमेचे महत्त्व, त्यातील जटिलता व जोखीम पाहता, अंतराळयान मोहिमेच्या कालावधीत भारतीय नौदलाला सर्व सज्ज ठेवण्यात येणार आहे, एवढे सांगितले म्हणजे विषयाचे गांभीर्य स्पष्ट होते. या संदर्भातील सराव प्रसंगांमध्येसुद्धा आपल्या नौदलाचा सहभाग असणार आहे. भारतीय अंतराळ मोहिमेचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, या संपूर्ण मोहिमेत इस्रो आणि त्यांच्या संशोधकांचा भर चुकांमधून शिकण्यावर, घोडचुका टाळण्यावरच राहणार आहे. त्याशिवाय, विज्ञान- तंत्रज्ञानापेक्षा प्रसंगी प्रत्यक्ष प्रक्षेपणात सहभागी होणाऱ्या अंतराळवीरांच्या सुरक्षिततेला धोरणात्मकदृष्ट्या सुरुवातच नव्हे, तर योजनेच्या पूर्वतयारीपासून महत्त्व दिले जाणार आहे. या मोहिमेकडे अंतराळ मोहिमेतील प्रमुख व उभ्या जगाला मार्गदर्शक ठरविण्याचा मनोदय इस्रोने यापूर्वीच जाहीर केला आहे.

अंतराळ मोहिमेशी संबंधित गुंतवणुकीकडे इस्रो दुहेरी दृष्टिकोनातून पाहात असल्याचे दिसते. यात एकीकडे शेकडो-करोडो रुपयांची मोठी आर्थिक गुंतवणूक, प्रगत व अद्ययावत तंत्रज्ञान व त्याच्याशी संबंधित आधी केलेले व प्रचलित असे संशोधन हे तर महत्त्वाचे आहेच. मात्र, त्याच जोडीला अंतराळ मोहीम प्रत्यक्षात साकारणाऱ्या व त्याला इस्रोच्या यशस्वी मोहीम-परंपरांमध्ये मूर्त रूप देणाऱ्या शास्त्रज्ञांची सुरक्षा इस्रोने सर्वोपरी मानली आहे.


इस्रोच्या नव्याने आखलेल्या अंतराळ मोहिमेशी निगडित महत्त्वाच्या बिंदूंमध्ये प्रचंड आर्थिक गुंतवणुकीद्वारे होणारे वैज्ञानिक संशोधन, विविध तयारी-चाचण्यांद्वारे होणारा अभ्यास, नव्या उपक्रमांतून नवे संशोधक-शास्त्रज्ञ घडविणे एवढेच नव्हे, तर नजीकच्या काळात जागतिक स्तरावर भारतीय अर्थव्यवस्थेला आभाळाएवढी उंची गाठण्याचे सामर्थ्य मिळणार आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

### समर्पित जीवन : छत्रपती यशवंतराव होळकर

छत्रपती शिवाजी महाराजानंतर स्वत: राज्याभिषेक करून घेणारे राजे म्हणजे यशवंतराव होळकर. त्यांनी आपल्या तलवारीच्या आणि युद्ध चातुर्याच्या जोरावर अनेकांना सळो की पळो करून सोडले होते. त्यांनी मराठ्यांच्या इतिहासामध्ये संपूर्ण देशांमध्ये आपल्या अनन्यसाधारण अशा कर्तृत्वाची, अचाट नेतृत्वाची, युद्धकौशल्याची, विश्वासघात पचवून सर्वांना सामावून घेण्याची, प्रसंगी निराश न होता त्यामधून मार्ग काढण्याची क्षमता जगाला दाखवून दिली त्याला इतिहासामध्ये तोड नाही. गनिमी कावा हे किती महत्त्वाचे साधन आहे हे छत्रपती शिवरायानंतर महाराजा यशवंतराव यांनी दाखवून दिले. त्यांनी मॉन्सूनसारख्या धूर्त व्यक्तीचा दारुण पराभव केला. नेपोलियनसारख्या सम्राटाचा ज्यांनी पराभव केला अशा वेलस्ली नावाच्या सेनापतीलाही पराभूत करून त्याला भारत देशातून जाण्यास भाग पाडले अर्थात इंग्रजांना हा पराभव फार जिव्हारी लागल्यामुळेच त्याला भारतातून परत बोलावून घेतले होते. महाराजांनी केलेली युद्धे ही फक्त मराठा साम्राज्याकरिता केलेली नसून ती संपूर्ण देशाच्या स्वातंत्र्यलढ्याकरिताच होती असे म्हटले तरी वावगे होणार नाही. त्या काळातील त्यांचे हे कार्य राष्ट्रभक्तांकरिता प्रेरणादायी असेच होते.



जगामध्ये अजिंक्य असणाऱ्या इंग्रजी फौजेला अठरा वेळा महाराजांनी पराभूत केले. त्यांना हिंदू धर्माबद्दल खूप प्रेम होते. मात्र त्यांनी दुसऱ्या धर्माचा कधीही तिरस्कार केला नाही. त्यांच्या सैन्यांमध्ये अनेक मुस्लिम व इंग्रज अधिकारी मोठ्या पदावर काम करीत होते हे विशेष होय. यशवंतराव महाराजांचा इतिहास हा आजच्या पिढीने जरूर वाचावा असाच आहे. शाहीर अमर शेख यांनी असे म्हटले आहे की, ज्यांच्या पायावरती लोटांगण । घातली इंग्रजांनी असा कोण हिंदभूषण ॥ ज्याचं शाहिरांनी नाव गाव । डोक्यावर घेऊनी नाचावं ॥

## वाचक पत्रे

इतिहासाला लेण व्हावं । लहान थोरांच्या ओठी ऱ्हावं ॥ यशवंतराव । फक्त एकच नाव ॥ अशा या महान पराक्रमी, कर्तृत्ववान, राष्ट्राभिमानी, धर्माभिमानी, आपल्या प्रजेवर प्रेम करणारे महाराज यशवंतराव होळकर यांचा आज राज्याभिषेक दिन त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन.

**श्रीराम मोतीराम पुंडे**/८२७५०६३६९८

### साहित्य संमेलने आणि संस्कृती...

नोव्हेंबर आणि डिसेंबर हे दोन्ही महिने साहित्य संमेलनांचेच होते. विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये जिल्हा साहित्य संमेलने आयोजित करण्यात आली होती. या संमेलनांना राज्य मराठी भाषा विभाग आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे पाच लाखांचे अनुदान देण्यात आले. पूर्वी हे अनुदान केवळ दोन लाख रुपये होते. हे वाढीव अनुदान कोणत्या कारणासाठी किंवा उद्दिष्टांसाठी दिले गेले हे ठळकपणे कुठेच मांडले गेले नसावे असे संमेलनांचे स्वरूप पाहून वाटते. संमेलनांच्या पत्रिका पाहता बहुतेक संमेलनामध्ये तेच ते ठरावीक कार्यक्रम घेण्यात आल्याचे जाणवले. ही साहित्य संमेलने आयोजित करणाऱ्यांनी दिवंगत ज्येष्ठ साहित्यिकांची नावेही ऐकली नसावीत इतके ते अनुल्लेखित राहिलेत.

प्राचार्य राम शेवाळकर, कवी अनिल, कुसुमावती देशपांडे, राम गणेश गडकरी, मुकुंदराज, ग्रेस, सुरेश भट, राजा बढे, आनंद टेकाडे, श्रीधर शनवारेंसारख्या थोर साहित्यिकांना योग्य स्थाने दिल्याचे जाणवले नाही. नवीन साहित्यिकांना या महाराष्ट्रात नव्हे, महाराष्ट्राबाहेरही विख्यात असलेल्या ज्येष्ठ साहित्यिकांची माहिती व आदर असणे आवश्यक आहे. अशीच विस्मित करणारी बाब म्हणजे राजकीय पक्षांसारखे, साहित्यिक पक्ष (गट) निर्माण झाल्याचे स्पष्टपणे लक्षात आले आणि राजकीय पक्षांसारखे एकमेकावर कुरघोडी करण्याचे प्रयत्नही दिसून आले. साहित्य सर्वसमावेशक असते, साहित्यिकाचे मन नि:पक्षपाती व विशाल असते, तो विश्वासाठी पसायदान मागतो हे साहित्याचे स्वरूप आजवर सर्वांनी पाहिले आहे. पण आता ही संस्कृती बदलणार असे दिसते.

देवादिकांच्या सात्त्विक प्रतिमा सोन्या-चांदीने मढवल्याने खऱ्या भक्तिभावाचा लोप आपण पाहतोच आहोत तसाच साहित्यिकाचा सोज्वळ चेहरा दिखाऊपणाच्या विलेपनाने फसवा होण्याची भीती आहे. सहभागींना दिले जाणारे भरघोस मानधन अनेक वाईट पायंडे पाडू शकते. मराठी भाषेचा विकास घडवायचा असेल तर जिल्ह्याच्या साहित्य संमेलनात त्याच जिल्ह्याच्या साहित्यिकांना संधी देण्यात यावी, त्यांचाच सहभाग असावा. साहित्य संमेलन प्रकल्प स्वरूपात घेण्यात यावे, साहित्य संस्कृती मंडळाने सगळ्या प्रकल्पांची समग्र तपासणी करून एक मोठा प्रकल्प उभा करावा, तो साकारण्यासाठी राज्य साहित्य संमेलन घ्यावे. केवळ निधी वाटपाने हे साध्य होणार नाही, एवढे तरी लक्षात घ्यावे.

**आशा पांडे**/९४२२२०७९२५

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### मनपा निवडणूका : पक्ष व अपक्ष उमेदवारांना चिन्हांचे वाटप, प्रचार सुरु

**परभणी / प्रतिनिधी -** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी शनिवारी (दि. ३) पक्ष व अपक्ष उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आले.

या निवडणुकीत तब्बल १३ राजकीय पक्ष व आघाड्या निवडणूक रिंगणात उतरल्या असून, त्यांच्यासह अपक्ष उमेदवारांनाही अधिकृत निवडणूक चिन्हे प्रदान करण्यात आली आहेत. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विविध पक्षांना त्यांची पारंपरिक चिन्हे देण्यात आली. यामध्ये भारतीय जनता पक्षाला कमळ, शिवसेनेला धनुष्यबाण, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मशाल, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला घड्याळ, वंचित बहुजन आघाडीला गॅस सिलेंडर, बहुजन समाज पक्षाला हत्ती, बहुजन मुक्ती पार्टीला टेबल, ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉकला सिंह, ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादूल मुस्लिमीनला पतंग, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला रेल्वे इंजिन, प्रहार जनशक्ती पक्षाला बैट तर आम आदमी पक्षाला झाडू हे चिन्ह देण्यात आले आहे.

याशिवाय अपक्ष उमेदवारांना एकूण १७ वेगवेगळी निवडणूक चिन्हे देण्यात आली असून, त्यामध्ये कपबशी, कोट, फुटबॉल, रोड रोलर, एअर कंडिशनर, दूरदर्शन संच, शिट्टी, छत्री, अंगठी, शिवणयंत्र, नारळ, कपाट, सफरचंद, बस, ट्रक, छताचा पंखा आणि चष्मा या चिन्हांचा समावेश आहे.

सर्व पक्षीय व अपक्ष उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे अधिकृत वाटप झाल्याने आता निवडणूक प्रचाराला वेग आला आहे. उमेदवार आपापल्या चिन्हांसह मतदारांच्या भेटीगाठी, सभा, प्रचारफेऱ्या यासाठी सज्ज झाले आहेत.

### प्रा.रविशंकर झिंगरे यांचा सेवागौरव सोहळा उत्साहात

**परभणी / प्रतिनिधी -** येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख प्रा. रविशंकर झिंगरे यांचा सेवागौरव समारंभ बुधवारी (दि. ३१) महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर होते. यावेळी माजी सभापती विजयराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशट्टी, उपप्राचार्य डॉ. रोहिदास नितोंडे, उपप्राचार्य प्रा. नारायण राऊत, प्रा. रविशंकर झिंगरे, अनुपमा झिंगरे, डॉ. सुरेंद्र येनोरकर, डॉ. विजय कळमसे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर प्रा. झिंगरे यांचा सपत्नीक शॉल, पुष्पहार व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव यांनी प्रा. झिंगरे यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे नमूद केले. प्रा. झिंगरे हे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक असून त्यांनी अध्यापन कार्य निष्ठेने आणि तत्परतेने पार पाडले. साहित्यलेखनाच्या माध्यमातून त्यांनी महाविद्यालय व परभणीचा नावलौकिक वाढवला असून मराठी साहित्याला नवे आयाम दिले. विद्यार्थ्यांमध्ये विषयाची गोडी निर्माण करण्यात त्यांचा विशेष हातखंडा होता, असे ते म्हणाले.

उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास केशट्टी यांनीही मनोगत व्यक्त करताना प्रा. झिंगरे यांचे सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्व अधोरेखित केले. अध्यापन आणि लेखन हा त्यांचा स्थायीभाव राहिला आहे. महाविद्यालय, साहित्य व वैयक्तिक जीवन यांची योग्य सांगड घातल्यामुळेच ते साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करू शकले, असे त्यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग व प्रशासकीय संघटनांच्या वतीनेही प्रा. झिंगरे यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. तुकाराम फिसफिसे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रामप्रसाद देशमुख यांनी केले, तर आभार डॉ. प्रशांत सराफ यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बालविवाह थांबविणे ही सामाजिक चळवळ व्हावी- ॲड. रवींद्र कात्नेश्वरकर :

**परभणी,/प्रतिनिधी :** बालविवाहामुळे कोवळ्या वयात सहन कराव्या लागणाऱ्या वेदनांची समाजाला जाणीव करून देणे अत्यंत आवश्यक असून, संवेदनशील समाजनिर्मितीतूनच हे शक्य आहे. या संवेदना जागृत करण्यासाठी व्यापक जनजागृती हवी आणि बालविवाह थांबविणे ही एक सामाजिक चळवळ व्हायला हवी, असे प्रतिपादन बालकल्याण समिती परभणीचे अध्यक्ष ॲड. रवींद्र कातनेश्वरकर यांनी केले.

येथील श्री सारंग स्वामी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शांतिनिकेतन माध्यमिक विद्यालयात शांतिनिकेतन माध्यमिक विद्यालयाच्या पुढाकाराने बालकल्याण समिती परभणी यांच्या माध्यमातून आज शनिवार ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिनानिमित्त विशेष पालक मार्गदर्शन व विद्यार्थी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमास बालकल्याण समितीचे सदस्य ॲड. गजानन चव्हाण, कोतवाली पोलिस ठाण्याचे माधव धंदे उपस्थित होते.

यावेळी बालकल्याण समितीच्या वतीने पालक व विद्यार्थ्यांना पोक्सो कायदा, बालकामगार कायदा तसेच बालविवाह प्रतिबंधक कायदा यांची सविस्तर माहिती देण्यात आली. बालविवाहामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक व मानसिक अडचणी, बालविवाहास उपस्थित राहिल्यास होणारी कायदेशीर शिक्षा तसेच त्यामुळे होणारे गंभीर नुकसान याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. बालहक्कांची पायमल्ली होते, हे स्पष्ट करत ॲड. कात्नेश्वरकर यांनी बालविवाहविरोधी हृदयस्पर्शी कविता सादर करून उपस्थितांचे मन

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाट्याने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# मनपा निवडणूकीत प्रचाराने गाठला कळस

## अनेक मातब्बर पक्ष लागले मतदारांच्या गाठीभेटीला, हेवे-दावे करण्यात झाले सगळैच मग्न

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-** महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीत बहुतांशी प्रभागात भारतीय जनता पाट, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे-काँग्रेस आघाडी या तीन प्रमुख प्रतिस्पध पक्षातील तूल्यबळ उमेदवारातच दुरंगी व तिरंगी लढती होतील, असं चित्र स्पष्ट झालं आहे.

उमेदवारी अर्ज माघारीच्या अंतीम मुदतीत म्हणजे शुक्रवार २ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत वैध ठरलेल्या पात्र उमेदवारांपैकी एकूण १९७ उमेदवारांनी आपआपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. यामध्ये हौसे-नवसे-गवसे उमेदवारांचा मोठा भरणा होता. प्रमुख राजकीय पक्षांच्या स्थानिक नेतेमंडळींसह प्रबळ उमेदवारांनी मतविभागणीस अडचणीचे ठरणारे हे हौसे-नवसे-गवसे इच्छुकांबरोबर पडद्याआड गुफ्तगू करीत किंवा अर्थपूर्ण चर्चा करीत मोठ्या शिताफीने रिंगणाबाहेर काढले. त्याचा परिणाम एकूण १६ प्रभागांतर्गत ६५ जागांवरील लढतीत ४११ उमेदवारच शिल्लक राहीले आहेत.

या लढतीत भारतीय जनता पाट, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा गट-काँग्रेस आघाडी प्रामुख्याने एकमेकांविरोधात पूर्ण ताकदिनिशी लढतील, असे चित्र स्पष्ट झाले आहे. शिवसेना शिंदे गटाचेही काही प्रभागातील उमेदवार या स्पर्धेत असतील, परंतु बहुतांशी उमेदवार हे मतविभागणीकरीता निर्णायक ठरतील, असे सर्वसाधारण चित्र आहे. वंचित बहुजन आघाडी, बहुजन समाज पक्ष, जनसुराज्य पक्ष, यशवंत सेना, एमआयएम यासह अन्य पक्षांचेसुध्दा काही उमेदवार रिंगणात आहेत.

एकूण १६ प्रभागांपैकी प्रभाग क्रमांक १ मधून भारतीय जनता पाट विरुध्द काँग्रेस-उबाठा आघाडी, प्रभाग क्रमांक २ मधून काँग्रेस-उबाठा आघाडी विरुध्द राष्ट्रवादी काँग्रेस, प्रभाग क्रमांक ३ मधून काँग्रेस विरुध्द शिवसेना उबाठा गटात मैत्रीपूर्ण लढत या व्यतिरिक्त राष्ट्रवादी काँग्रेस अशी तिरंगी लढत होत आहे. प्रभाग क्रमांक ४ मधून शिवसेना उबाठा गट, भारतीय जनता पाट व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात तिरंगी लढत होईल व शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार या लढतीत रंगत आणतील, असे चित्र आहे.



प्रभाग क्रमांक ५ मधून शिवसेना उबाठा गट, भारतीय जनता पाट, शिवसेना शिंदे गट व यशवंत सेना अशा चौरंगी लढतीचं चित्र आहे. प्रभाग क्रमांक ६ मधून राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा गट व काँग्रेस यांच्यातच तिरंगी लढत होईल, असे चित्र असून बहुजन मुक्ती पाट, वंचित बहुजन आघाडी, शिवसेना शिंदे गट या लढतीत रंगत आणतील. प्रभाग क्रमांक ७ मधून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पाट व शिवसेना शिंदे गट यांच्यात चार गटात दुरंगी, तिरंगी व चौरंगी लढती होत आहेत. प्रभाग क्रमांक ८ मधून काँग्रेस विरुध्द शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या आघाडीतील दोन्ही मित्रपक्षातच थेट अटीतटीची लढत होत आहे. या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस व भाजपाचेही उमेदवार रिंगणात आहेत.

प्रभाग क्रमांक ९ मधून काँग्रेस-शिवसेना उबाठा गट आघाडी, भारतीय जनता पाट व शिवसेना शिंदे गट अशी तिरंगी लढत होत आहेत.

### राजकीय पक्षांच्या सभेने वाढणार चुरूस

**प्रमुख राजकीय पक्षांनी उमेदवारी नाकारल्यानंतर काही प्रभागांमधून इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी अपक्ष म्हणून आपली उमेदवारी कायम राखली. त्यामुळे हे अपक्ष उमेदवार प्रमुख राजकीय पक्षाच्या प्रबळ उमेदवारांना मतविभागणीकरीता डोकेदुखी ठरु लागले आहेत. हे नाराज उमेदवार रिंगणाबाहेर यावेत, यासाठी त्या त्या पक्षांच्या उमेदवारांसह प्रमुखांनी अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्नांची पराकाष्टा केली. परंतु, फारसे काही हाती आले नाही. पडद्याआडील गुफ्तगू व अर्थपूर्ण चर्चा प्रभावी ठरल्या व यातील बहुतांशी उमेदवार हे मतविभागणीकरीता रिंगणात कायम राहिले आहेत.**

प्रभाग क्रमांक १० मधून राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठा, भारतीय जनता पाट व शिवसेना शिंदे गट अशा चौरंगी लढती होवू लागल्या आहेत. प्रभाग क्रमांक ११ मधून काँग्रेस विरुध्द राष्ट्रवादी काँग्रेस अशा थेट लढती आहेत. तर यशवंत सेना व एमआयएमचेही उमेदवार रिंगणात उतरले आहेत. प्रभाग क्रमांक १२ मधून भारतीय जनता पाट, शिवसेना उबाठा गट, राष्ट्रवादी काँग्रेस यांसह वंचित बहुजन आघाडी, यशवंत सेना तसेच काही प्रभावी अपक्षही रिंगणात आहेत.

प्रभाग क्रमांक १३ मधून राष्ट्रवादी काँग्रेस विरुध्द शिवसेना उबाठा गट व काही गटात काँग्रेस विरुध्द राष्ट्रवादी काँग्रेस अशी लढत होत आहे. प्रभाग क्रमांक १४ मधून काँग्रेस विरुध्द राष्ट्रवादी काँग्रेस अशी थेट लढत होत आहे. जनसुराज्य शक्ती, एमआयएम, यशवंत सेनेचेही उमेदवार याठिकाणी रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक १५ मधून भारतीय जनता पाट, शिवसेना उबाठा गट व शिवसेना शिंदे गटात तिरंगी लढती आहेत. प्रभाग क्रमांक १६ मधून शिवसेना उबाठा गट, राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात दुरंगी तर काही गटात तिरंगी लढती होवू घातल्या आहेत.

### प्रचाराचा आवाज घुमू लागला

**परभणी,/प्रतिनिधी-** महापालिकेच्या निवडणूकीच्या प्रचाराचा शुभारंभ झाला असून आता गल्लोगल्ली या निवडणूकीचा प्रचाराचा आवाज घुमू लागला आहे. त्यातच आता उमेदवारांना अवघ्या कमी दिवसांत आपला प्रचार करावा लागणार असल्याकारणामुळे आपण त्यांना जास्तीत जास्त मतदारापर्यंत जाण्यासाठी जोमात प्रचार करावा लागणार असून आता काही दिवसांतच हा प्रचार आवाज आणखी वाढणार आहे.

## व्हाईस ऑफ मीडियाच्या वतीने साडेसात कोटीच्या विम्याचे मोफत पत्रकारांना वाटप



**परभणी,/प्रतिनिधी-** दर्पण दिनाच्या औचित्य साधून जिंतूर तालुका प्रेस क्लब व व्हाईस ऑफ इंडिया च्या वतीने ५२ पत्रकारांचा साडेसात कोटी रुपयांचा विमा पॉलिसी वाटप कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये पार पाडला.

भारतीय डाक विभागाच्या वतीने आदित्य बिर्ला ७४९ रुपयात १५ लाख रुपयाचा वार्षिक विमा मोफत देण्यात आला.

जिंतूर येथे झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार राजाभाऊ नगरकर होते .प्रमुख पाहुणे नगराध्यक्ष प्रताप देशमुख, पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे, गटविकास अधिकारी सुभाष मानकर, उद्योजक ब्रिजगोपाल तोष्णीवाल, प्राचार्य श्रीधर भोंबे, गटनेते सचिन गोरे,नगरसेवक अँड गोपाळ रोकडे , नगरसेवक प्रदीप चव्हाण, ह भ प संदीप भाई शर्मा महाराज ,व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रमेश दरगड ,अँड मनोज सारडा, डॉ. दुर्गादास कानडकर, आदींच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी जेष्ठ पत्रकार म्हणून राजाभाऊ नगरकर ,प्रवीण मुळी, किसन प्रसाद खाडे, दीपक राजुरकर ,मंचकराव देशमुख यांचा शाल ,श्रीफळ, डायरी ,पेन देऊन सत्कार करण्यात आला .यावेळी सुधीर शहाणे ,देवेंद्र भुरे ,गणेश कुरे, राजेंद्र देवकर संचालक, किशोर देशपांडे,कमल किशोर जयस्वाल, गजानन येरमवार ,मनोज चवडे, संतोष चौधरी, ऑ.सुनील मते ,कैलास खंदारे, सुनील वट्टमवार, सुदर्शन अच्छा, गजानन वट्टमवार, अशोक अच्छा, सागर चिद्रवार, विनोद राठोड, रवी घुगे, अभिजीत देशमुख ,सुशील काबरा, सुनील तोष्णीवाल ,कृष्णा चिद्रवार ,शिवाजी देवळे ,अँड सुधाकर जाधव, आधी प्रतिष्ठित नागरिकांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन विजय चोरडिया यांनी तर आभार प्रदर्शन ऍड मनोज सारडा यांनी केले.

## ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी थाटले स्वतःचे दवाखाने

### सोनपेठ येथील प्रकार; जिल्हा शल्यचिकित्सकांचा कानाडोळ

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ,/प्रतिनिधी:** सोनपेठ येथील ग्रामीण रुग्णालयात शासकीय नौकरीवर असलेल्या काही डॉक्टरांनी शहरात टोलेजंग इमारतींमध्ये खाजगी दवाखाने थाटून गेली पाच वर्षांपासून बिनदिक्कत व्यवसाय सुरू केले आहेत.या प्रकाराची पाठराखण करतंय तरी कोण? आणि अशा गंभीर बाबींची परभणी जिल्हा शैल्य चिकित्सक यांना यत्किंचितही माहिती नसने ही बाबा कितपत योग्य आहे? असा सवाल सर्वसामान्य नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

सोनपेठ तालुका निर्मिती पासून तालुक्यातील रुग्णांच्या सेवेसाठी एक प्राथमिक आरोग्य केंद्र होते. परंतु तालुक्यातील अनेक राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांच्या आणि लोकप्रतिनिधींच्या प्रयत्नातून सोनपेठला ग्रामीण रुग्णालयाची मान्यता मिळाली व शासनाच्या निधीतून ग्रामीण रुग्णालयाची टोलेजंग इमारत उभारण्यात आली. ग्रामीण रुग्णालयासाठी पाहिजे त्या प्रमाणात डॉक्टर व इतर कर्मचाऱ्यांचा अद्यापही तुटवडा आहे. जेमतेम शासकीय व कंत्राटी कर्मचाऱ्यांवर तालुक्यातील रुग्णांची मदार आहे. सध्या या ग्रामीण रुग्णालयात दररोज



उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या २०० ते २५० पर्यंत ची आहे. एखाद्या आजाराची साथ असेल किंवा सोमवार या आठवडी बाजारच्या दिवशी रुग्णांची संख्या जास्तीची असते. शासकीय रुग्णालयामध्ये वैद्यकीय सेवा करणाऱ्या डॉक्टरांनी स्वतःच्या किंवा इतरांच्या खाजगी दवाखान्यात काम करू नये म्हणून शासनाकडून त्यांना ३५ टक्के व्यवसायरोध भत्ता देण्यात येतो. जेणेकरून शासकीय दवाखान्यात उपचारासाठी येणाऱ्या गोरगरीब रुग्णावर वेळेत व व्यवस्थित उपचार मिळावेत. येथे काम करणाऱ्या वैद्यकीय डॉक्टरांना शासनाकडून नियमानुसार लाखभर रुपयापेक्षा जास्त पगारही दिल्या जातो. परंतु एवढ्या मोठ्या पगारावरही काही डॉक्टरांचे समाधान होताना दिसून येत नाही. त्यामुळे येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून ग्रामीण रुग्णालयात ड्युटी करण्यासाठी आठवड्यातून दोन-दोन दिवस आपसामध्ये वाटून घेतले जातात व तडजोडीप्रमाणे आठवड्यातून दोन दिवस ड्युटी केल्या जाते. बाकी इतर दिवस संबंधित प्रशासनाच्या नाकावर टिचून बिंदिकितपणे स्वतःच्या दवाखान्यात खाजगी व्यवसाय करण्यात सोनपेठ येथील ग्रामीण रुग्णालयातील काही डॉक्टरांनी सुरुवात केली आहे. ही बाब आरोग्य सेवेच्या दृष्टीने कितपत योग्य आहे? याबाबतीत जिल्हा शैल्य चिकित्सक यांनीच खुलासा करण्याची गरज निर्माण झाली आहे. कारण त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या परभणी जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयातील काही डॉक्टर, खाजगीत प्रॅक्टिस करत असल्याचे लोकशासन आंदोलन पार्टीचे परभणी जिल्हाअध्यक्ष सचिन काळे यांनी दि.१० डिसेंबर २०२५ रोजी एका लेखी निवेदनाद्वारे ही बाब जिल्हा शैल्य चिकित्सक यांच्या निदर्शनास आणून दिली होती. याप्रकरणी परभणी जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयाच्या डॉक्टरांनी खाजगी व्यवसाय बंद केलाही असेल, परंतु सोनपेठ तालुक्यातील डॉक्टरांनी थाटलेले स्वतःचे दवाखाने जिल्हा शैल्य चिकित्सक पाहतील का? आणि पाहून त्यावर काय कारवाई करणार? याकडे मात्र तालुक्यातील सामान्य जनतेचे लक्ष लागून राहिले आहे. खाजगी दवाखान्यात स्वतःचा व्यवसाय करणारे सोनपेठ येथील ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर कोण? त्यांच्या दवाखान्यांची नावे काय आहेत व ते कुठे आहेत? याबाबतीत सविस्तर वृत्तांत बातमीच्या पुढील भागात लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वित्त विभागात शिल्पा निलावाड यांची निवड

**पूर्णा,/प्रतिनिधी-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वित्त विभागात शिल्पा निलावाड यांची निवड करण्यात आली आहे.



पूर्णा तहसील कार्यालयातील कर्मचारी शिल्पा उत्तमराव निलावाड यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वित्त विभागात लेखाधिकारी वर्ग एक या पदावर निवड झाली आहे.

पूर्णा तहसील कार्यालयात मागील दोन महिन्यापासून पुरवठा विभागात कार्यरत असलेल्या कर्मचारी शिल्पा उत्तमराव निलावाड यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून वित्त विभागात लेखाधिकारी वर्ग एक या पदासाठी निवड झाली आहे नुकताच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून यामध्ये त्यांची या पदासाठी निवड झाली आहे यापूर्वी त्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पूर्णा येथील तहसील कार्यालयात पुरवठा विभागात कार्यरत होत्या त्या बीकॉम बी टेक पदवीधारक आहेत त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे पूर्णा तहसीलदार माधवराव बोथीकर,तहसीलदार उत्तमराव निलावाड,कोषागार अधिकारी प्रकाश कोत्तावार,ॲड. संजय गव्हाणे,संपत तेली,सतीश टाकळकर,नायब तहसीलदार सतीश नाईक,पंढरीनाथ शिंदे प्रशांत थारकर,राजेश्वरी बचाटे, उज्वला पुलावाड आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## महाविकास आघाडी व महायुती यांच्यांत वाढले हेवेदावे

**परभणी ,/प्रतिनिधी-** महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीतील लढतीचं चित्र स्पष्ट झाल्याबरोबर प्रमुख राजकीय पक्षांच्या प्रबळ उमेदवारांसह अन्य पक्ष व बंडखोर उमेदवारांनी दहा दिवसांचा अल्प कालावधी ओळखून स्वतःस प्रचारयुध्दात जूंपले आहे.

शुक्रवार २ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज माघारीकरीता राजकीय पक्षांच्या नेतेमंडळींसह त्या त्या प्रभागातील प्रबळ उमेदवारांनी प्रयत्नांची पराकाष्टा केली. त्यात काहींना यश मिळाले, तर काहींच्या पदरात अपयश पडले. परंतु, लढतीचं चित्र लगेचच स्पष्ट झाले. त्यामुळे त्या त्या प्रभागातील प्रबळ उमेदवारांनी तात्काळ प्रत्यक्ष लढतीवर लक्ष केंद्रीत केले.

निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर काही दिवसांपासून प्रबळ उमेदवार व त्यांचे समर्थक प्रचारयुध्दावर जूंपले होते. परंतु, प्रत्यक्ष लढतीचं चित्र स्पष्ट झाल्याबरोबर या प्रबळ उमेदवारांनी कुटूंबातील साऱ्या सदस्यांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सुपूर्त केल्या. स्वतःची प्रचार यंत्रणा तसेच सौभाग्यवती असो किंवा मुलांच्या स्वतंत्र प्रचार यंत्रणा बांधणीचा प्रयत्न सुरु केला. काही उमेदवारांनी त्यांचे नाते-गोते, सगे-सोयरे व मित्र परिवारांना पाचारण करीत त्यांच्याद्वारेही स्वतंत्र प्रचार यंत्रणा उभारण्याचा



प्रयत्न सुरु केला. या व्यतिरिक्त मतदार यादीची छाननी, त्यातील अनुकूल असणारे मतदार, आग्रह केल्यानंतर मिळू शकणारे मतदान किंवा न मिळणारेही मतदान या गोष्टीचाही या प्रबळ उमेदवारांनी अंदाज घ्यावयास सुरुवात केली. बाहेरगावी असणाऱ्या मतदारांना मतदानाकरीता परभणीत कसं आणता येईल, या दृष्टीनेही प्रयत्नांची पराकाष्टा सुरु केली. त्यासाठी खास यंत्रणा उभारुन बाहेरगावी असणाऱ्या मतदारांशी संपर्क साधण्याचा, त्या ठिकाणी स्वतंत्र अशी कार्यकर्त्यांची फळी उभारण्याचा प्रयत्न सुरु केला.

प्रचार साहित्य तसेच जाहीरनामे, परिचयनामे व आजपर्यंत केलेल्या कामांचा आढावा असणाऱ्या पुस्तिका तातडीने बाहेर काढल्या व हे साहित्य सर्वसामान्य मतदारांपर्यंत पोहोचविण्याकरीता व्यूहरचना सुरु केली. त्याचबरोबर आपल्या खास कार्यकर्त्यांबरोबर या प्रबळ इच्छुकांनी शुक्रवारी संध्याकाळपासून गुफ्तगू सुरु केले. या निवडणूका सोप्या नाहीत, या लढती अत्यंत अटीतटीच्या आहेत, तूल्यबळ आहेत. त्यामुळे कोणीही कोणत्याही आत्मविश्वासात वावरु नका, हे दहा दिवस महत्वाचे आहेत. डोअर टू डोअर प्रचार केल्याशिवाय पर्याय नाही, अशा सक्त सूचना या प्रमुख उमेदवारांनी आपआपल्या कट्टर समर्थकांना दिल्या. तसेच पॅनल टू पॅनलच मतदान मागा, असेही आवर्जून नमूद केले.

या प्रबळ उमेदवारांनी सोशल मिडीयासह अन्य पर्यायाच्या माध्यमातून सामान्य मतदारांपर्यंत पोहोचण्याकरीता अन्य कसरती करण्याचाही प्रयत्न सुरु करण्यास प्रारंभ केला आहे.

# बीडमध्ये भरदिवसा थरार आधी गोळ्या झाडल्या मग चाकूने भोसकले; तरुणाची निर्घृण हत्या




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ जानेवारी**

फुटलेली पाईपलाईन दुरूस्त करणार्या एका तरूणावर अज्ञात तरूणाने गोळीबार करत दोन गोळया झाडल्या. गोळया लागल्यानंतरही तो तरुण जिवंत असल्याचे पाहून हल्लेखोरांनी पुन्हा चाकूने भोसकून त्याची हत्या केली. या हल्ल्यानंतर तो जागीच ठार झाला. ही भयंकर घटना बीड शहरातील अंकुशनगर भागामध्ये घडली. या थरारक घटनेने बीडमध्ये खळबळ उडाली आहे.

बीड नगर पालिकेमध्ये कॉन्ट्रॅक्ट बेसवर असलेला हर्षद शिंदे हा कर्मचारी अंकुशनगर भागामधील साई पंढरी लॉन्ससमोर फुटलेली पाईपलाईन दुरूस्तीचे काम करत होता. तो कामामध्ये मग्न असताना अज्ञात मारेकर्याने हर्षदच्या दिशेने गोळीबार करत दोन गोळ्या झाडल्या. यात हर्षद शिंदे जखमी झाला. घटनास्थळापासून काही अंतरावर जखमी अवस्थेत स्वत:चा जीव वाचवण्यासाठी धडपडणार्या हर्षदचा मारेकर्याने पाठलाग करत धारदार चाकूने त्याला भोसकले. यात हर्षद शिंदे जागीच ठार झाला. ही खळबळजनक घटना दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली. या घटनेमुळे बीड शहरामध्ये खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती कळताच बीड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घडलेल्या ठिकाणी स्थानिक रहिवाशांनी मोठी गर्दी केली.

# परळी पोलिसांकडून ८ लाखाचे चंदन जप्त; आरोपी ताब्यात



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.६ जानेवारी**

दि. ०५.०१.२०२६ रोजी सायंकाळी १९.०० वाजताचे सुमारास श्री. ऋषिकेश शिंदे सहायक पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई यांना गोपनीय बातमीदारामार्फत खात्रीलायक माहिती मिळाली की, मौजे धर्मापुरी ते पानगाव रस्त्याच्या डाव्या बाजूस असलेल्या गायराण जमिनीत काही इसम प्रतिबंधित चंदनाची बेकायदेशीर खरेदी-विक्री व वाहतूक करत आहेत.

सदर माहितीच्या आधारे सहा. पोलीस अधीक्षक श्री. ऋषीकेश शिंदे यांनी त्यांचे पथक तात्काळ रवाना करुन रात्री २१.०० वाजताचे सुमारास मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी अचानक छापा टाकला.

छाप्यात पुढील आरोपी विनापरवाना बेकायदेशीररित्या चंदनाची तस्करी करताना मिळून आले :१. पप्पु बाबुराव सूर्यवंशी (वय ४०) २. राहुल पप्पु सूर्यवंशी (वय २३) ३. तेजस कल्लप्पा कांळीबे (वय २५) (रा. अशोक नगर, परळी वै., जि. बीड) ४. नितीन सटवा जाधव (वय २२), रा. हनुमान नगर, परळी वै., जि. बीड ५. अविनाश व्यंकट जाधव (वय २३) ६. व्यंकट रामचंद्र जाधव (वय ४५) (दोन्ही रा. फुलेनगर, उदगीर, जि. लातूर) ७. भारत निवृत्ती गायकवाड (वय ४०), रा. नाकलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.

आरोपींच्या ताब्यातुन पुढील प्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चंदन लाकूड १०४ किलो (किंमत २,६०,०००/-), चंदन साल ३९ किलो (किंमत ३९,०००/-), टाटा इंडिगो चारचाकी कार ३,००,०००/-, चार दुचाकी वाहने - अंदाजे १,६०,०००/-, एक विनानंबर दुचाकी २०,०००/-, ७ मोबाईल फोन - अंदाजे ६१,०००/-, लोखंडी तराजू व वाकस १,०००/- - असा एकुण मुद्देमाल किंमत ८,२१,०००/- प्रमाणे पंचांसमक्ष जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अंमलदार २१६९ सतेश कांगणे यांचे फिर्यादीवरुन आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन परळी ग्रामीण येथे गुन्हा रजि. क्रमांक १२/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२), ३१७(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहा. पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक असद शेख (अंबाजोगई ग्रामीण), पोलीस उपनिरीक्षक निमोने (परळी ग्रामीण), पोह. बासर, बिक्कड (अंबा. ग्रामीण), उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील पोह. सतेश कांगणे, सफौ. सोडगीर, पोअं/ उत्तरेश्वर केदार, खंदारे यांनी केली आहे.

# राष्ट्र सेविका समितीचा, हा घोषनाद जगतात निनादत राहो-ह.भ.प.प्रज्ञाताई.

## उत्तमव्यक्ती निर्मितीच्या समिती कार्यात प्रोजेक्टवर्क म्हणून वेळ दिला पाहिज-सौ धनश्रीताई

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ जानेवारी**

स्त्रीशक्तीची एकजूट, संघटन, सामर्थ्य आणि विनम्रतेचे दर्शन या घोषवादनातून होते आहे, हा एकाचा नाही तर सामूहिक घोषनाद, तोही मंगल स्वरात देखील महत्त्वाचे आहे. व्यक्तिगत आणि सामूहिक गीता पेक्षा प्रांगणीय संगीताचा आवाज मोठाच असतो, युद्धाची सुरुवात, ऊर्जा निर्मिती,वीर रस निर्माण करणारा हा घोषनाद संघटनेत देखील महत्त्वाचा आहे. नाद ,स्वर नीटनेटकेपणा येतो, यातुनच समाज शुद्धता देखील होतजाते .प्रोजेक्टवर काम करण्याची पद्धती आजकाल निर्माण झाली आहे ,हे प्रोजेक्टवर्क म्हणून हाती घेऊ असा संकल्प या नवति स्वरशक्ती कार्यक्रमातून घेऊ ,असे आवाहन पश्चिम महाराष्ट्र प्रांत घोष प्रमुख सौ धनश्री केदार फाटक (पुणे )यांनी केले.



जागृतीसाठीचा आहे. देशासाठी धर्मासाठी याची नितांत गरज आहे .निर्मितीचे वरदान परमेश्वरानंतर स्त्रीकडेच आहे, यासाठी संस्कार ,संघटन म्हणून वंदनीय मावशींनी ९० वर्षांपूर्वी लावलेले हे रोपटे आज वटवृक्षाचा निनाद झाला आहे, हा मंगल स्वर जगभर पसरत राहो असा गौरव राष्ट्रीय कीर्तनकार ह. भ. प. प्रज्ञाताई रामदास यांनी बीड येथील नवति स्वरशक्ती - घोषवादन कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना केला.

ताल,सुर,शब्दा सोबतच भावनेचे गीत, घोषनाद संघटनेत भगवंताशी नाळ जोडते .विजयश्री निर्माण होते .संगीत ही एक थेरपी आहे. भारतीय रागांची मांडणी स्वभावाची मिळतेजुळती अशीच आहे. एका तासाच्या बौद्धिकचे महत्त्व, तीन मिनिटाच्या गीतातून समजून येते. मी व्यक्तिगत छान गायन वादन करते तेव्हा आनंद मिळतो पण त्यापेक्षाही मोठा आनंद मी सर्वांसोबत मिसळून तालसुरात कशी राहू शकते, यात मिळतो. घोषातील रचना शास्त्रशुद्ध शिकून प्रभुत्व निर्माण करूया .शास्त्रशुद्धतेच्या आग्रहामुळे दैनंदिन जीवनात देखील

साधनांचा अभाव असलेल्या काळात १९३६ साली सायकलवर सेविकाप्रमुखांनी संपर्क साधत राष्ट्रसेविका समितीचे कार्य केले .अनेक चढउतार संघटनेतही येतात ,या ९० वर्षाच्या कार्यकाळात समितीलाही तसे आले, त्यातही वेळ -बुद्धी- तन-मन देऊन सेविकांनी कार्य केले. वेळ नाही, हे कारण बाजूला सारून प्रत्यक्ष सेवाकार्य सोबतच, उत्तम व्यक्ती निर्माण होण्यासाठी च्या समितीच्या कामासाठी प्रोजेक्टवर्क म्हणून वेळ दिला पाहिजे, असे आवाहनही सौ. धनश्रीताईंनी केले.

बीडच्या सिद्धिविनायक संकुल मैदानावर रविवारी सायंकाळी संपन्न झालेल्या या स्थिर घोषवादन कार्यक्रम प्रसंगी मोठ्या संख्येने गणवेशातील सेविका, नागरिक बंधू-भगिनी यांची मोठी उपस्थिती होती.

# योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या स्वामी रामानंद तिर्थ वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ.ममता राठी यांची जाळून हत्या ? प्रकृती चिंताजनक; संशयीत फरार

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.६ जानेवारी**

अंबाजोगाई: येथील एका नामवंत महाविद्यालयात कार्यरत असलेल्या महिला प्राध्यापिका डॉ.ममता राठी (जाखोटिया) यांनी रविवारी दुपारी जवळगाव शिवारात स्वतःला पेटवून घेत आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या भीषण घटनेत त्या ८० टक्क्यांहून अधिक भाजल्या असून त्यांची प्रकृती अत्यंत गंभीर आहे. शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडवून देणाऱ्या या घटनेची माहिती मिळताच बर्दापूर पोलिसांनी सोमवारी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आहे.



दरम्यान, ममता राठी यांनी टोकाचे पाऊल का उचलले याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही. त्यांना तातडीने पुढील उपचारासाठी लातूर येथील एका खासगी रुग्णालयातील अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले असून, तिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी रुग्णालयात जाऊन त्यांचा जबाब नोंदवून घेतला आहे. या प्रकरणाचा तपास करत असताना पोलिसांनी कौटुंबिक कलह, कामाचा मानसिक ताण किंवा अन्य काही गंभीर कारणांचा शोध सुरू केला आहे.

बर्दापूर पोलीस या प्रकरणाचा कसून तपास करत असून या घटनेशी संबंधित आणखी एक व्यक्ती सध्या फरार असल्याची माहिती समोर आली आहे. पोलीस त्या फरार व्यक्तीचा शोध घेत असून लवकरच या आत्महत्येच्या प्रयत्नामागील गूढ उकलण्याची शक्यता आहे. या घटनेमुळे अंबाजोगाई शहर आणि परिसरातून मोठी हळहळ व्यक्त होत असून सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# एस.पी.ऑफिस येथे विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ जानेवारी**

विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, कायद्याची जाणीव आणि उज्ज्वल भविष्यासाठी योग्य दिशा निर्माण करण्याच्या उद्देशाने पोलीस अधिक्षक नवनीत काँवत व अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर आणि प्रशिक्षणार्थी आयपीएस राहुल कुमार यांच्या उपस्थितीत पोलीस वर्धापन दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यशाळा पोलीस अधिक्षक कार्यालय, बीड या ठिकाणी संपन्न झाली. या कार्यशाळेत पोलीस अधिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत थेट संवाद साधत शिक्षणासोबतच शिस्त, जबाबदारी, निर्व्यसनी राहणे, सोशल मिडीयाचा योग्य वापर कसा करावा याची माहिती दिली. सदरील कार्यशाळेमध्ये श्री.शिवाजी विद्यालय व संस्कार विद्यालयाचे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

यावेळी पोलीस अधिक्षक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, चुकीच्या एका क्लिकमुळे संपुर्ण आयुष्य डिस्टर्ब होवून जाते तुम्ही आजचे विद्यार्थी हे उद्याचे देशाचे भवितव्य आहात त्यामुळे तुम्ही जीवनात असे ज्ञान प्राप्त करा की त्याचा तुम्हाला आणि समाजाला व देशाला लाभ झाला पाहिजे. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर व पोलीस हवालदार बाळासाहेब नागरगोजे यांनी विद्यार्थ्यांना पोलीस नियंत्रण कक्ष येथे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, सायबर शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप अराक, अनैतिक मानवी प्रतिबंधक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव, दहशतवादी विरोधी पथक पीएसआय शेखर औटे , जिल्हा विशेष शाखेचे पोलिस निरीक्षक मुकुंद कुलकर्णी , जिल्हा वाहतुक शाखेचे सपोनि सुभाष सानप येथे प्रत्यक्ष दर्शनीस्थळी नेवून संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांच्यासोबत संवाद साधून दिला व मार्गदर्शनपर माहिती दिली.

# मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी नगरपरिषद ला निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ जानेवारी**

बीड शहरात अनेक ठिकाणी मोकाट कुत्रे दिसून येतात. बीड येथील चक्रधर नगर भागातील दीनदयाल शोध संस्थान संचलित नानाजी देशमुख विद्यामंदिर परिसरात मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला असून त्याचा त्रास विद्यार्थी पालक व शिक्षक यांना होत आहे. या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी आज शाळेच्या वतीने बीड नगर परिषदेचे मुख्याधिकारी साहेब यांना निवेदन देण्यात आले. त्यांनी या कुत्र्यांचा बंदोबस्त लवकरात लवकर करण्यात येईल असे आश्वासन दिले.

# कै.दत्ताजी भाले संकुलात विद्यार्थी स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**तभा वृत्तसेवा**
**अंबड दि.६ जानेवारी**

कै. दत्ताजी भाले संकुल येथे दिनांक ४ जानेवारी वार रविवार रोजी विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन दोन सत्रात सकाळी ११ ते १ शिशुवाटिका व माध्यमिक विभागाचे स्नेहसंमेलन व सायंकाळी ५ ते ७.३० या वेळात इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले. सकाळी स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.श्री.व्यंकटेशजी गोसावी, तसेच उद्घाटक म्हणून स्थानिक व्यवस्थापन समितीचे कार्यवाह मा.श्री.केदारजी मंत्री लाभले होते. तसेच सायंकाळी इयत्ता पहिली ते सातवीच्या स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या उपाध्यक्षा मा.सौ.ज्योतीभाभी ठाकूर व उद्घाटक म्हणून अंबड चे पोलीस निरीक्षक मा.श्री.संतोषजी घोडके सर लाभले होते.कार्यक्रमास मंचावर उपस्थित कै.दत्ताजी भाले विद्यालयाचे कायम निमंत्रित सदस्य मा.डॉ.राजेंद्रजी भाला, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.श्री.श्रीपादजी जपे साहेब, अर्थ समिती अध्यक्ष श्रीम.माधुरीताई बागडे, माध्य. विद्यालयाचे मुख्याध्यापक मा.श्री.सुधाकरजी घायतडक सर, प्राथ. विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री. प्रदीप जी जोशी सर, शिशुवाटिका विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीम.प्रणितताताई वाघमारे, माध्यमिक विभागाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ.रेखाताई देशमुख,प्राथमिक विद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती. सुवर्णलता खानापूरकर, सहप्रमुख श्रीमती रीता मुगटकर उपस्थित होते.प्रथमतः सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.*

*यावर्षीचे स्नेहसंमेलन पंचपरिवर्तन या थीम वर आधारित ठेवण्यात आले होते.उद्घाटनानंतर सकाळच्या सत्रात शिशुवाटिकेचा सांस्कृतिक कार्यक्रम अतिशय सुंदर व दर्जेदारपणे साजरा करण्यात आला. त्यानंतर माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर असा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. सायंकाळच्या सत्रात इयत्ता पहिली ते सातवी मधील विद्यार्थ्यांनी बालगीत, दिंडी,भारुड, पर्यावरण नाटिका,मराठी भाषा गौरव गीत, शिवबाचं नाव,दैवत छत्रपती,भक्तीगीत, भावगीत, देशभक्तीपर गीत, स्फूर्तीगीत, भरतनाट्यम, गोंधळ, कथ्थक, मंगळागौर, गरबा, वीररस निर्माण करणारे गीत,योगा नृत्य,गणपती गीत,पंजाबी नृत्य, आई-वडिलास समर्पित गीत या व अशा अनेक प्रकारावर आधारित नृत्य सादर करून अंबडवासीयांचे मनोरंजन केले व त्यांची मनं जिंकली.*

*सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीम.आम्रपाली बोराळे,सौ.निशाताई जपे व श्री.अनिल चव्हाण सर यांनी केले.ऋणनिर्देश सौ.रेखाताई देशमुख व श्रीम.सुवर्णलता खानापूरकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाची ध्वनी व्यवस्था श्री. नितेश चव्हाण सर व श्री. मारुती झाटे सर यांनी केली.तसेच छायाचित्रण व रेकॉर्डिंग श्री.नितेश चव्हाण सर व श्री. शरद माळोदे सर यांनी केले. कार्यक्रम संपन्नतेसाठी दोन्ही विभागाचे मुख्याध्यापक श्री.सुधाकर घायतडक सर व श्री.प्रदीपजी जोशी सर यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभागाच्या सहप्रमुख श्रीम.रीता मुगटकर, सौ.रागिनी जोशी,श्रीम.मेघा वायकोस,श्रीम.अनुराधा भाकरे, श्रीम.प्रतिभा आजबे,श्रीम.कल्पना बनसोडे,श्रीम.स्वाती.बारहाते, श्री. सुनील कुंभार,सर श्री.योगेश दातीर सर, श्री.गणराज जाधव सर, श्री. लक्ष्मीकांत सामग सर, श्री.उबाळे सर व तसेच शाळेतील सर्व कर्मचारी वर्ग सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.




किशोर आप्पा पिंगळे यांचा नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना राजर्षी शाहू मित्र मंडळ शाहूनगर, बीड

# वाळू माफीया विरोधात महसूल-पोलिस विभागाची संयुक्त कारवाई

## २०० ब्रास वाळू, पोकलेनसह ४० लाखांचा मुद्देमाल जप्त




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जानेवारी**

सेनगाव तालुक्यातील मांगवाडी शिवारातील पूर्णा नदीच्या पात्रात महसूल आणि पोलिस विभागाच्या पथकाने छापा टाकून एका पोकलेन मशीनसह २०० ब्रास वाळू असा एकूण ४० लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोघांवर सेनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस अधीक्षक डॉ नीलभ रोहन यांच्या काळात अवैध धंद्यांवर बडगा उगारण्यात आल्यामुळे कारवायांना वेग आला आहे.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर वाळू माफीया सक्रीय झाला असून या वाळू माफीयांना राजकीय वरदहस्त असल्यामुळे त्यांच्या मनात भिती राहीली नाही. परंतु नूतन पोलिस अधीक्षक डॉ नीलभ रोहन यांनी पदभार स्विकारल्यापासून वाळू माफीयांवर धडाधड कारवाया होतांना दिसत आहेत. दोन दिवसांपूर्वी औंढा आणि हिंगोली येथे अवैध वाळू वाहतुक करणारे टिप्पर पकडले. वाळू माफीयांवर होणाऱ्या कारवायांमुळे वाळू माफीयांमध्ये खळबळ उडाली आहे.

जिल्ह्यातील अवैध वाळू उपसा आणि वाहतुक रोखण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल व पोलिस विभागाची पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथकांकडून दररोज वाळू घाटांवरील मार्गावर थांबून वाहनांची तपासणी केली जात आहे. याशिवाय पहाटेच्या सुमारास वाळू घाटावर जाऊन पाहणी केली जात आहे.

दरम्यान सेनगाव तालुक्यातीम मांगवाडी शिवारातील पूर्णा नदीच्या पात्रातून पोकलेनच्या सहाय्याने वाळूचा उपसा केला जात असल्याची माहीती पोलिसांना मिळाली होती. या माहीतीच्या आधारे उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार सखाराम मांडवगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सेनगावचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दिपक मस्के, मंडळ अधिकारी खंडेराव पोटे, जमादार टी के वंजारे, सुभाष चव्हाण, कातकडे, चाटसे, केंद्रेकर, गवई, कांबळे यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी जाऊन पाहणी केली. यावेळी पोलिस व महसूल विभागाचे पथक येत असल्याचे लक्षात येताच पूर्णा नदीपत्रात काम करणारे दोघेही फरार झाले. पोलिसांनी घटनास्थळावरून एक पोकलेन मशीन तसेच नदी पात्रातून उपसा केलेली २०० ब्रास वाळू, १५० ब्रास मुरूम असा एकूण ४० लाखांच मुद्देमाल जप्त केला आहे.

याप्रकरणी मंडळ अधिकारी खंडेराव पोटे यांच्या तक्रारीवरून शिवम जाधव, गजानन तुरे रा ब्राम्हणगाव ता जिंतूर जि परभणी यांच्या विरूध्द सेनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. जमादार चाटसे पुढील तपास करीत आहेत.

दरम्यान, शासनाचा लाखो रूपयांचा महसूल बुडवून अजूनही जिल्ह्यात वाळू माफीया राजरोसपणे वाळू उपसा आणि वाहतुक करीत आहे. जोपर्यंत या अवैध धंद्यातील मोठा मासा गळाला लागत तोपर्यंत अवैध वाळू उपसा थांबणार नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील राजकीय वरदहस्त असलेल्या माफीयांवर कारवाई होणे आवश्यक आहे.

# गुगुळपिंपरी शाळेत रस्ता सुरक्षा अंतर्गत जनजागृती कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जानेवारी**

गुगुळपिंपरी येथील जिल्हा परिषद शाळेत रस्ता सुरक्षा, जीवन सुरक्षा अभियान राबविण्यात आले. यावेळी उपप्रादेशिक अधिकारी राहुल गावडे यांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले.

रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून जनजागृती करण्यात येत आहे. गुगुळपिंपरी येथील शाळेत निबंध स्पर्धा घेण्यात आली होती. इयत्ता ५ वी ते ८ वी च्या विध्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र उप प्रादेशिक परिवाहन कार्यालयाच्यावतीने देण्यात आले. यावेळी उपप्रादेशिक अधिकारी राहुल गावडे व अतुल बनापुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थी व गावकरी यांना रस्ता सुरक्षिततेचे धडे दिले.

या कार्यक्रमासाठी गावकरी मंडळी, सरपंच, शा.व्य.समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांनी सहकार्य केले. पांडुरंग चोपडे हस्ताक्षर तज्ञ यांनी रस्ता सुरक्षिततेचे नियम पाळण्याची ग्वाही सर्व गावकरी यांच्या वतीने दिली. राहुल गावडे व अतुल बनापुरे यांनी शाळा, शालेय परिसर, विध्यार्थी गुणवत्ता व विद्यार्थ्यांचे सुंदर हस्ताक्षर पाहून कौतुक केले. गावकरी शाळेला करत असलेली मदत बघून अतिशय आनंदी झाले. या कार्यक्रमासाठी उपस्थित शाळेचे उच्च श्रेणी मुख्याध्यापक सुभाष पोहकर सरपंच नारायण खोडे, शा.व्य.समिती अध्यक्ष शामराव सुर्वे, उपाध्यक्ष प्रकाश इंगोले, पांडुरंग चोपडे, प्रफुल्ल तायडे, कडुजी खोडे, कडुजी तायडे, कैलास बांगर, विष्णू तायडे व सर्व गावकरी मंडळी व शाळेचे सर्व शिक्षक किशोर हनवते, उद्धव रनबावळे, भाऊराव शिंदे, भागवत डांगे, नारायण बोरकर, दत्ता लहाने, सुनिल अडबलवार यांनी कार्यक्रमाचे यशस्वीपणे आयोजन केले.

# जिल्हा माहीती कार्यालयात पत्रकारांच्यावतीने दर्पण दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जानेवारी**



मराठी पत्रकार सृष्टीचे आद्य जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ मध्ये दर्पण नावाचे पहिले मराठी साप्ताहिक सुरू केले होते. म्हणून ६ जानेवारी हा दिवस पत्रकार दिन म्हणून साजरा करण्यात येत असतो. जिल्हा माहिती कार्यालय येथे सकाळी ११ वाजता पत्रकार दिन साजरा करण्यात आला.

यावेळी प्रथमता आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहते, चंद्रकांत कारभारी, माध्यम व विस्तार अधिकारी मारोती पोले यांच्या सह ज्येष्ठ पत्रकार मकरंद बांगर, सुभाष अपूर्वा, सुखदेव बलखंडे, गोपाल सरनाईक, कल्याण देशमुख, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रद्युम्न गिरीकर, पठाण, दिपके, प्रकाश इंगोले, सुधाकर वाढवे, विजय गुंडेकर आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना प्रद्युम्न गिरीकर म्हणाले की, समाजाचा आरसा जनतेसमोर मांडण्याचे काम पत्रकार करीत असतो. शासन आणि प्रशासनातील उणीवा तसेच चांगली कामे जनतेसमोर आणून लोकाभिमुख काम पत्रकारीतेच्या माध्यमातून होत आहे. आज पत्रकारांसमोर अनेक आव्हाने उभी आहेत तरीही हा लोकशाहीचा चौथा स्तंभ ताठमानेने उभा आहे. शासनाने पत्रकारांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणीही यावेळी त्यांनी केली. यावेळी अनेकांनी आपली मते मांडली.



**हिंगोली- जगद्गुरू रामानंदाचार्य नरंद्राचार्य महाराज यांच्यावतीने येथील देवडा नगर भागातील विठ्ठल-रूख्मीनी मंदिर येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराचे उद्घाटन डॉ संजय नाकाडे यांचेहस्ते करण्यात आले. यावेळी विठ्ठल चौतमल, नगरसेवक रत्नाकर बांगर, सुमित कांबळे, विश्वनाथ इंगळे, अविनाश देशमुख, संतोष चव्हाण, राम जाधव, सौ रेखा गव्हाणकर, बंटी पवार, संतोष मोटे, बाबुराव हराळे, अरूण घाटोळे, लक्ष्मण कांबळे आदी. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### आश्विन पतंगे यांना मराठवाडा रत्न पुरस्कार



हिंगोली- सिंधू बहुद्देशीय सेवाभावी संस्था अंधारवाडी तर्फे विविध क्षेत्रातील मान्यवरांना मराठवाडा रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये रेनापुर ता. कळमनुरी येथील शेतीनिष्ठ शेतकरी आश्विन बळीराम पतंगे (पानपट्टे) यांना कृषी क्षेत्रातील उत्तम योगदानाबद्दल मराठवाडा रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दि ४ जानेवारी २०२६ रोजी साहित्य, कला, क्रीडा, कृषी, विज्ञान, उद्योजकता व राजकीय अशा विविध क्षेत्रातील विशेष कामगिरीसाठी मराठवाडा रत्न पुरस्कार देऊन मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. अश्विन पतंगे स्वतः संगणकशास्त्राचे पदयुत्तर पदवीधर असून सुद्धा कृषी क्षेत्राची आवड असल्यामुळे स्वतःच्या शेतीत विविध प्रयोग करून शेती उत्पादन वाढविणे, नैसर्गिक रित्या दशपर्णी अर्क, लिंबोळी अर्क, जीवामृत इत्यादी औषधी तयार करून स्वतःच्या शेतात वापरली व उत्पादन वाढ करून दाखविली. सदरील बाबीचे प्रशिक्षण गावातील इतर शेतकऱ्यांना दिले. या कार्याची दखल घेऊन सिंधू सेवाभावी बहुउद्देशीय संस्था अंधारवाडी ता. जि. हिंगोली मार्फत अश्विन पतंगे व त्यांच्या सुविद्य पत्नी रोहिणी पतंगे यांचा मराठवाडा रत्न पुरस्कार देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, नांदेडचे मुद्रांक जिल्हाधिकारी महेश वडतकर तसेच अहमदपूर येथील प्राचार्य यादवराव गायकवाड यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या पुरस्कार सोहळ्याला हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष ज्योतीताई कोथळकर, आदर्श महाविद्यालय हिंगोली येथील उप प्राचार्य साहू, सिंधू सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष गोपाल भोस, राष्ट्रपती पुरस्कार विजेते राऊत सर, डॉ. कोरडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार मिळाल्याबद्दल हिंगोली जिल्हा कृषी अधिकारी राजेंद्र कदम, तालुका कृषी अधिकारी कळमनुरी के एम जाधव, सुपरवायझर नंदकुमार वाईकर, कृषी सहाय्यक रमेश पोहनकर, कृषी सहाय्यक ज्योती कदम यांनी अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### नायलॉन मांझा विक्री करणाऱ्यावर कार्यवाही

हिंगोली- शहरातील रिसाला बाजार भागात पुनमचंद पुरनलाल यादव हा शासनाने बंदी केलेला नायलॉन मांझा विक्री करीत असल्याची माहीती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संबंधितावर कार्यवाही करीत त्याच्याकडून मांझाचे ६ बंडल किंमती ६ हजार रूपये जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# श्रीमती शांताबाई दराडे विद्यालयात स्वयंशासन दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जानेवारी**



भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथे सावित्रीबाई फुले जयंती निमित्त स्वयंशासन दिन साजरा केला गेला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली गेली.

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी अध्यापनाचे काम केले. एक सहशालेय उपक्रम या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगी नेतृत्व कला गुण विकसित व्हावेत, समायोजन क्षमता, अध्यापन कौशल्य आणि शिक्षकांच्या कार्याची महती व शालेय प्रशासन लक्षात यावे या उद्देशाने विद्यार्थ्याला भावी जीवनामध्ये वाटचाल करता यावी याकरिता मुख्याध्यापक म्हणून वैभव इंगोले तर उपमुख्याध्यापक म्हणून गितेश करेवार या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी भूमिका बजावली तसेच इयत्ता दहावीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी अध्यापक म्हणून अध्यापनाचा व वर्ग नियंत्रणाचा अनुभव घेतला.

कार्यक्रमाचे आयोजन व अंमलबजावणी यामध्ये शाळेतील अध्यापक संजय गुठ्ठे, अमोल कान्हेड, संगीता जाधव, जागृती गोरे, मिलिंद पाठक, अरुण चोंढेकर यांनी मोलाची भूमिका बजावली. पर्यवेक्षक अनिल लोळेवार, भारत शिंदे व मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ प्रकाश अंभोरे यांनी सर्व सहभागी विद्यार्थी व मार्गदर्शक अध्यापकांचे अभिनंदन केले.

# सेनगाव नगराध्यक्षपदासाठी दोन नामांकन अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जानेवारी**

सेनगाव नगर पंचायतच्या नगराध्यक्षा मनिषा देशमुख यांनी राजीनामा दिल्यामुळे आता नगराध्यक्ष पदासाठी दोन उमेदवारांनी नामांकन दाखल केले आहे. दि ९ जानेवारीला नगराध्यक्षपदाची निवडणुक होणार आहे.

उर्वरित सव्वा वर्षाच्या काळासाठी ही नगराध्यक्षपदाची निवडणुक होणार आहे. यासाठी दि ५ जानेवारीला नगर पंचायत सभागृहात उबाठा शिवसेनेतर्फे यमुना देशमुख यांनी तर भारतीय जनता पक्षाच्यावतीने मीरा खाडे यांनी उमेदवारी अर्ज सादर केले असून दोन्ही नामनिर्देशन प९ वैध ठरविण्यात आली आहेत. येत्या ९ जानेवारीला सेनगाव नगर पंचायतच्या नगराध्यक्षपदासाठी निवडणुक होणार असून या निवडणुकीकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे. नामनिर्देशन प्रक्रिया निवडणुक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सखाराम मांडवगडे आणि सहाय्यक निवडणुक अधिकारी अरविंद मुंडे यांच्या उपस्थितीमध्ये पार पडणार आहे. सध्याच्या पंचवार्षिक कार्यकाळात ज्योती देशमुख उबाठा शिवसेना, गायत्री देशमुख व मनिषा देशमुख राष्ट्रवादी अजित पवार गट यांनी सव्वा-सव्वा वर्ष नगराध्यक्षपदाचा कार्यभार सांभाळला आहे.

आता उर्वरित सव्वा वर्षाचा कालावधीसाठी ही निवडणुक होणार आहे. सेनगाव नगर पंचायतीमध्ये पक्षीय बलाबल पाहता भारतीय जनता पक्षाचे ५, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ५, उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे ५ तर काँग्रेसचे २ नगरसेवक आहेत.

दरम्यान, नगर पंचायतीच्या आतापर्यंतच्या कालावधीत भारतीय जनता पक्षाला बाजूला ठेवीत राष्ट्रवादी, उबाठा शिवसेना आणि काँग्रेस यांनी अभद्र युती केली आहे. यावेळी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे काय चमत्कार करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले असून सेनगावात आता राजकीय हालचालींना वेग आला आहे.

# संघर्ष करणारे इतिहास निर्माण करतात- व्याख्याते सतीश सातोणकर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जानेवारी**



संघर्ष करणारे माणसे इतिहास निर्माण करतात. मराठा संस्कृती जपण्याचे काम मराठा समाजाने केले आहे. ७४० वर्ष मराठ्यांनी सर्वांना सामावून घेतले असल्याचे मत विचारवंत, लेखक सतीश सातोणकर यांनी ६ जानेवारी सोमवार रोजी हॉटेल शांती येथे मराठा सेवा संघ आयोजित जिजाऊ व्याख्यानमालेत तिसरे पुष्प गुंफतांना व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाचचे अध्यक्ष जिल्हाधिकारी राहूल गुप्ता तर उद्घाटक अधिष्ठाता चक्रधर मुंगल यांच्या हस्ते झाले. यावेळी कृषी उपसंचालक प्रसाद हजारे, पिडीसी बँकेचे माजी उपाध्यक्ष उत्तमराव मगर, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण लक्ष्मण काळे, डॉ. अनिल सवनेकर यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना सातोणकर म्हणाले की, बाबासाहेबांनी निजामाचे ऐकूण सही केली असती तर आज मराठवाडा निजामाच्या ताब्यात असता. यानंतर त्यांनी मराठवाड्यातील विविध संग्रामात मराठ्यांनी केलेले कार्य अधोरेखीत केले. यामध्ये त्यांनी देवगिरी, नागपूर करार, सिलिंगमधील जमीन यासह १९३८ ते १९६६ दरम्यानचा कार्यकाल याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

मराठवाड्यातील २७ टक्के जनता प्रशासनात असावी असे त्यांनी सांगितले. त्यांच्या उन्नतीसाठी मागासवगीर्या प्रमाणे सर्व सुविध उपलब्ध करून द्याव्यात असे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी दांडेकर समिती, केळकर समिती, नागपूर करार या विषयी देखील मार्गदर्शन केले. औरंजेबाने मराठ्यासोबत दुश्मनी केली नसती तर आलमगिर राहिले असते असे त्यांनी सांगितले. मराठवाडा हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने लढला असल्याचे त्यांनी सांगितले. ५२ मराठ्याच्या आडनावाने देशाला योध्दे दिले असल्याचा त्यांनी उल्लेख केला.

संघर्ष निर्माण करणारे माणसे इतिहास निर्माण करतात असे सांगून त्यांनी मराठा संस्कृती, मराठा समाज देणारा असल्याचा उल्लेख त्यांनी यावेळी केला. तसेच मराठवाड्यासाठीचे बाबासाहेबाचे महान कार्य जनतेसमोर आले नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. बाबासाहेब देशमुख यांना भारतरत्न देण्यासाठी सर्वात प्रयत्न करावे अशीही बोलले यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी मराठवाड्याच्या हुतात्म्या संदर्भात माहिती घेतली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. यश खंदारे यांनी केले. जिजाऊ वंदना जिजाऊ नामदेव कर्हाळे यांनी घेतली. प्रास्ताविक संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सतीश जाधव यांनी केले. वक्त्याचा परिचय शिवराज सरनाईक यांनी करून दिला.विशेष सहकार्य मारोतराव बुद्रुक पाटील यांनी केले. तर सेवा संघाचे जिल्हा सचिव राजकुमार वायचाळ यांनी आभार मानले. राष्ट्रगीत सुधाकर बल्लाळ यांनी सादर केले.

मनोज आखरे, खंडेराव सरनाईक, शिवाजीराव ढोकर पाटील, पंडितराव अवचार, पंडितराव शिरसाट, परसराम हेंबाडे, सुधाकर मेटकर, सौरभ चव्हाण, शिवाची मेटकर, गजानन मगर, शिवराज सरनाईक, महेश राखुंडे,प्रा. गोपाल भोस, नितीन इंगळे, गणेशराव शिंदे, गणेशराव गरड, एकनाथराव कर्हाळे, विश्वास वानखेडे, गजानन जाधव, विजय पवार, संदीप जाधव, नामदेव सरकटे,अमोल खिल्लारी, गजानन सावके, ओम तांबिले ,संदीप बोरकर आदींनी परिश्रम घेतले.

# अपहरण प्रकरणाची एसआयटी चौकशी करावी : जिवन घोगरे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ जानेवारी-**

विधान परिषदेची संधी देण्याची मागणी पक्षश्रेष्ठीकडे केल्याचा राग मनात धरुन आमदार प्रताप पाटील चिखलीकर व माजी आमदार मोहन हंबर्डे यांनी त्रास देण्यास सुरुवात केली तर याच कारणामुळे दि.२२ डिसेंबर रोजी अपहरण करुन मारहाण करण्यात आली. या सर्व प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली असल्याची माहिती माजी विरोधी पक्षनेते जीवन घोगरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



सन १९९९ पासून मी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कार्यरत आहे. आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांना पक्षात आणण्याबरोबरच त्यांना निवडून आणण्यासाठी देखील खूप प्रयत्न केले. परंतु मलाच राष्ट्रवादी पक्षाच्या जिल्हाध्यक्ष पदावरुन काढले. विधानसभा निवडणुकीनंतर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार व प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांच्याकडे मी विधान परिषदेची संधी देण्याची मागणी केली होती. याचा राग मनात धरुन त्यांनी दि.२२ डिसेंबर २०२५ रोजी माझे अपहरण करुन मला मारहाण केली. मारहाण करणारे सर्व गुंड त्यांचेच असून, या सबंधाने माझ्याकडे पुरावे देखील उपलब्ध आहेत. हे सर्व पुरावे देशाच्या गृहमंत्री यांना देखील देण्यात आले असून, नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून त्यांना देखील या प्रकरणात एसआयटी नेमण्याची मागणी केली असून, बीड जिल्ह्याप्रमाणे माझाही संतोष देशमुख होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमुद केले असल्याचे माजी विरोधी पक्षनेता जीवन घोगरे यांनी सांगितले.

# नगर परिषदेच्या नवनियुक्त नगराध्यक्षा टेकाळे'सह नगरसेवकांचा आज पदग्रहण सोहळा

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ६ जानेवारी-**

देगलूर नगरपरिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे एकतर्फी वर्चस्व मिळवत नगराध्यक्षासह पंधरा नगरसेवक राष्ट्रवादी पक्षाचाच उपनगराध्यक्ष होणार हे निश्चित झाले आहे. विरोधी पक्षांकडून उपनगराध्यक्ष पदाचा मुस्लीम उमेदवारांचे कार्ड खेळण्यात आले, पण राष्ट्रवादीकडून ड. देशाई अंकुश सुरेशराव यांचे जवळपास निश्चित झाले आहे. केवळ अधिकृत घोषणा शिल्लक राहिली आहे.

दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून गटनेता म्हणून पदमवार उज्वला लक्ष्मीकांत तर काँग्रेस पक्षाचे गटनेते शेख मीरामोहीयोद्दीन शेख सातार यांची आपापल्या पक्षाकडून अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून उपनगराध्यक्ष पदासाठी मुस्लिम कार्ड खेळण्यात आले असले तरी लक्ष्मीकांत पदमवार यांच्या नेतृत्वाखाली उपनगराध्यक्ष पक्षाचा तोडगा उत्तम पद्धतीने काढण्यात आला आहे. येणाऱ्या काळात देगलूर नगर परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून देशाई'सह तीन उपनगराध्यक्ष पहावयास



## उपनगराध्यक्ष, गटनेता आणि स्विकृत सदस्य झाले फायनल अधिकृत घोषणा बाकी

मिळणार असल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच काग्रे पक्षाकडून स्विकृत सदस्य (नगरसेवक) म्हणून पक्षश्रेष्ठींकडून अविनाश निलमवार यांचे नाव फायनल झाले असल्याचे सांगण्यात येते. तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाकडून स्विकृत सदस्य म्हणून सय्यद मोहियोद्दीन व संतोष नारलावार यांच्या नावाची केवळ घोषणा शिल्लक राहिली आहे.

नगरपरिषदेच्या सार्वजनिक निवडणूकीत विजयाचे गणित जुळविण्यासाठी अनेक इच्छुकांना स्विकृत सदस्यांचे आश्वासन देण्यात आले होते. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला विजय मिळाल्यामुळे ईच्छूक स्विकृत सदस्यांची यादी मोठी असल्याचे सांगण्यात येत आहे. पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे लक्ष्मीकांत पदमवार आणि वरीष्ठ नेत्याकडून यांच्याकडूनही रामबाण उपाय शोधण्यात आला आहे. पाच वर्षात तब्बल सहा स्विकृत सदस्य राष्ट्रवादीकडून पहायला मिळणार आहेत. त्यामुळे रुसवे-फुगवे निश्चितच संपतील असे, सुत्राच्या अधिकृत माहितीनुसार चित्र स्पष्ट झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे लक्ष्मीकांत पदमवार म्हणाले की, वचननाम्याप्रमाणे दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करु आणि देगलूर शहर महाराष्ट्रात एक अग्रगण्य शहर म्हणून शहराची ओळख करु, असे पदमवार यांनी सांगितले. तर विरोधी पक्षांकडून काँग्रेस पक्षातील जाहिरनाम्यानुसार कामे करुन घेण्यासाठी प्रयत्न करु केवळ विरोध म्हणून विरोध करणार नाही, तर शहराच्या विकासासाठी आम्हीही कटीबद्ध राहू, असे काँग्रेसकडून सांगण्यात आले आहे.



## हाणेगाव ते लोणी देगलुर राष्ट्रीय महामार्गचे काम निकृष्ट

**हाणेगाव** - देगलुर तालुक्यात सर्वात शेवटचा भाग म्हणजे हाणेगाव परीसर असुन तिन राज्याला जोडणारा रस्ता याच गावातुन जातो आहे तेलंगाना कर्णाटक महाराष्ट्र या राज्याच्या वाहनांची येथुन नेहमीच वर्दळ असते येथुनच राष्ट्रीय महामार्ग रस्त्याचा हाणेगाव ते लोणी सी सी रस्त्याचे नवख्याने काम चालु असुन एका बाजुचे काम अर्धवट झाले आहे यावर व्यवस्थीत पाणी  क्युरींग नाही गोटा मुरुमावर भर नाही दर्जेदार सिमेंटचा वापर नाही वाळुचा वापर नाही तर साध्या डस्टचा वापर करुन रस्त्याचा काम करत आहेत.एकीकडे केंद्र शासन राज्यशासन रस्तेजोड संकल्पनेतुन लाखो रुपये मंजुर करुन देत असताना काम मात्र निकृष्ठ दर्जेचा होत असल्याचे प्रवासी नागरीकातुन चर्चा होत आहे .बऱ्याच नागरीकांनी या रस्त्यासाठी उठाव घेतल्यामुळेच निधी उपलब्ध झाला आहे पण निधी उपलब्ध होऊन सुद्धा रस्त्याचा काम व्यवस्थीत होत नसल्यामुळे नागरीक  वर्गातुन नाराजीचा सुर उमटत आहे याच रस्त्यावरुन तिन्ही राज्याच्या जड वाहनांची ये-जा असते जर रस्त्याचा काम निकृष्ठ झाल्यास लाखो रुपये व्यर्थ जाणारतर नाहीत ना असा प्रश्न प्रवाशी वाहनधारक लोकांना पडला आहे.जर संबंधीत विभागाने या रस्त्याकडे बारकाईने लक्ष दिल्यास रस्त्याचा काम दर्जेदार होईल यात शंका नाही एकेकाळी याच रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असुन रस्त्यात खड्डा की खड्यात रस्ता हेच कळेनासे झाले होते पण बऱ्याच लोकांच्या उठावानंतर अतीमत: निधी मंजुर होऊन कामाला यश आला आहे जर संबंधीत विभागाने गांभिर्याने लक्ष दिले तर या रस्ताचा चांगला आणि दर्जेदार काम होईल अशी सुशिक्षीत नागरीकातुन चर्चा होत आहे.

## प्रभाग क्रमांक ८ मधून सय्यद अशपाक अपक्ष उमेदवार

**नांदेड** -महापालिका निवडणुकीसाठी प्रभाग क्र.८ मधून तेहरानगर येथील सय्यद अशपाक सय्यद मुसा यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला असून, त्यांना जनतेचा प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. मागील अनेक वर्षापासून सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या सय्यद अशपाक सय्यद मुसा यांना निवडणूक लढविण्याचा आग्रह प्रभागातील मतदारांनीच केला होता. त्यांनी कुठल्याही पक्षाकडे उमेदवारी न मागता प्रभाग क्र.८ ड मधून अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यांना कप-बशी निशाणि मिळाली आहे. सध्याची राजकीय परिस्थिती पाहता कुठला पक्ष कुणाशी युती करेल याचे तारतम्य नसल्यामुळे अपक्ष म्हणूनच जनहिताची कामे व्हावीत यादृष्टीने मनपा निवडणुकीसाठी अर्ज दाखल केला असल्याचे सय्यद अशपाक सय्यद मुसा यांनी सांगितले. तेहरानगर, श्रावस्तीनगर हा भाग मुस्लिम बहुल असल्याने सहसा या भागाकडे कुणाचे लक्ष जात नाही. पूरपरिस्थितीमुळे अनेकवेळा या भागातील नागरिकांच्या घरांचे नुकसान झाले आहे. तरी देखील प्रशासनाकडून कुठलीही मदत वेळेवर केली गेली नाही. त्यामुळे या प्रभागात मतदारांची कामे तातडीने व्हावीत यासाठीच अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला असून, जनतेच्या जोरावर विजय देखील मिळेल, असा विश्वास सय्यद अशपाक सय्यद मुसा यांनी व्यक्त केला.



## अपक्ष उमेदवार ॲड. प्रसेनजीत वाघमारे यांचा विकासात्मक लढा



**नवीन नांदेड** - नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १९ मधील अपक्ष उमेदवार ॲड. प्रसेनजीत केरबा वाघमारे हे विकासात्मक कामावर आपला लढवत आहेत तरी या उच्च विद्याविभूषित उमेदवारास मतदारानी आपली पहिली पंसदी द्यावी नांदेड मनपा निवडणूका- २०२५ ची रणधुमाळी सुरू झाली असून प्रत्येक पक्षाने आपापली प्रचार याची नारळ फोडून कॉर्नर बैठका प्रचार सभेस सुरुवात करण्यात आली आहे. याचबरोबर सिडको भागातील रहिवासी ॲड. प्रसेनजीत वाघमारे हे उच्च विद्यालय घोषित उमेदवार प्रभाग क्रमांक १९ मधून आपला विकासाचा मुद्दा घेऊन निवडणूक रिंगणात उभे असून.त्यांची निशाणी संगणक (कम्प्युटर) असून त्यांना कवठा,वसरणी, भीमवाडी रहिमपूर, सिडको, असर्जन या भागातील मतदारांचा पाठिंबा मिळत असून त्यांच्या कार्याची नोंद सर्व नागरिक घेत आहेत यापूर्वी यांनी या विभागात भरपूर विकास कामे करून लोकांच्या आवश्यक समस्या सोडवण्यासाठी रत्नदीप प्रयत्न करीत आहेत त्यांच्याशी सदर प्रतिनिधीने संवाद साधला असता मी वकिली व्यवसाय सांभाळून प्रभागातील समस्या व अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करीत आहे त्यांच्या कामाच्या शैलीमुळे या प्रभागातील जनतेचा कौल यांच्या  पाठीशी आहे.

## माधुरी शिवराम लुटे यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ६ जानेवारी-**



मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक शिवराम तुकाराम लुटे यांच्या सुविद्य पत्नी माधुरी शिवरामजी लुटे (वय ४६) यांचे अल्पशा आजाराने हैदराबाद येथील खाजगी रुग्णालयात मंगळवार, दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या या अकाली निधनाने लुटे परिवारवर शोककळा पसरली आहे.त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता काळेश्वर स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.त्यांच्या पश्चात पती, एक मुलगी व एक मुलगा असा परिवार आहे.

## फुलवळ येथे दर्पण दिन साजरा

**तभा वृतसेवा**
**फुलवळ, दि. ६ जानेवारी-**

मराठी पत्रकारितेचे जनक म्हणून ओळखले जाणारे दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून ६ जानेवारी हा पत्रकार दिन म्हणून सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.  त्याच प्रमाणे कंधार तालुक्यातील फुलवळ मराठी पत्रकार संघानेही तो आज मोठ्या उत्साहात साजरा करतांना वृक्षारोपण करून बाळशास्त्री जांभेकर यांना नम्रपूर्वक अभिवादन केले.

नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात पहिले पत्रकार भवन निर्माण केलेल्या फुलवळ पत्रकार संघाकडून हा पत्रकार दिनाचा सोहळा सरपंच प्रतिनिधी नागनाथराव मंगनाळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात प्रथमतः दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. तदनंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार होताच जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या वतीने संपूर्ण पत्रकारांचा शाल , पुष्पहार देऊन  गौरव करण्यात आला.

फुलवळ पत्रकार संघाकडून याच जि . प. कें. प्रा. शाळेच्या आवारात अनेक रोपट्यांचे मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले व एकजुटीचा सामुदायिक संकल्प करत निर्भीड पत्रकारिता करतांना लेखणीच्या माध्यमातून गरजू , उपेक्षित  , वंचितांना न्याय मिळवून देत गाव व समाज विकासासाठी सकारात्मक बातम्या छापून लेखणीची धार कायम तेज ठेवत पत्रकारितेवरील विश्वासार्हता कायम  ठेवण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचा संकल्प ही करण्यात आला .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार संघाचे सल्लागार डॉ. प्रदीपसिंह राजपूत यांनी केले तर पत्रकार विश्वांभर बसवंते यांनी आपल्या मनोगतातून फुलवळ पत्रकार संघाच्या कार्याचा आढावा मांडला. सूत्रसंचालन वीरभद्र मठपती यांनी तर आभार के. एच. पांचाळ यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक कामजी मंगनाळे , गवळे सर , पुराणिक मॅडम , गवळे मॅडम , शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष परमेश्वर फुलवळे , उपाध्यक्ष आखिल निचलकर , माजी अध्यक्ष मंगेश पांचाळ व त्यांचे सर्व सहकारी यांनी परिश्रम घेतले.

यावेळी फुलवळ पत्रकार संघाचे अध्यक्ष परमेश्वर डांगे , उपाध्यक्ष होनाजी शेळगावे , सचिव धोंडीबा बोरगावे , कार्याध्यक्ष ड . उमर शेख , पत्रकार मधुकर डांगे , पत्रकार विश्वाम्भर बसवंते , शादुल शेख आदी पत्रकारासह कु. आराध्या डांगे , बालाजी बोरगावे , शेषेराव सोमासे , बालाजी कांबळे , हिराकांत मंगनाळे केशव बसवंते  , संजय डांगे आदींची उपस्थिती होती.

## कामजळगा येथे लाडक्या बहिणींना साडीचोळी भेट व निरोप समारंभ

**तभा वृतसेवा**
**मुखेड, दि. ६ जानेवारी-**

तालुक्यातील मौजे कामजळगा येथे येणाऱ्या मकर संक्रातीचे तसेच मुलगा व सुनबाई यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुखेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती शिवलिंगराव पाटील कामजळगेकर यांनी गावातील सर्व महिलांना साडीचोळी वाटप कार्यक्रम तसेच निरोप समारंभ आयोजित केला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी मुखेड तालुक्याचे लाडके कार्यसम्राट आमदार डॉ. तुषारजी राठोड होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मुखेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती ड. खुशालराव पाटील उमरदरीकर, डॉ. विरभद्र हिमगिरे, निरोपमूर्ती नरसिंग सोनटक्के सर, संस्थाचालक माधव राठोड, महावीर शिवपुजे, मनोज कांबळे, शिवाजी राठोड, पांडूरंग गुट्टे,तलाठी वाघमारे, उपसरपंच प्रतिनिधी प्रा. यशवंत कांबळे, पोलिस



पाटील प्रतिनिधी नागोराव सोनकांबळे यांची उपस्थिती होती. यावेळी आमदार डॉ. तुषार राठोड व प्रमुख पाहुणे यांच्या शुभहस्ते गावातील जवळपास ३०० लाडक्या बहिणींना साडीचोळी भेट देण्यात आल्या. शिवलिंगराव पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकातून आज उपस्थित नसलेल्या  ६०० पेक्षा जास्त महिलांना त्यांच्या घरी जावून साडीचोळी भेट देण्यात येणार असल्याचे सांगितले तसेच आमदारांनी कामजळगा हे गाव दत्तक घेवून गावाचा विकास करावा अशी विनंती केली. त्यानंतर जि.प.प्रा. शा कामजळगा येथून मंग्याळ शाळेत बदलून गेलेले विद्यार्थीप्रिय शिक्षक तथा निरोपमूर्ती नरसिंग सोनटक्के गुरुजींना गावकऱ्याच्या वतीने आमदार डॉ. तुषार राठोड यांच्या शुभ हस्ते यथोचित सत्कार करून निरोप देण्यात आला. यावेळी गावातील सेवानिवृत शिक्षक पोतदार गुरुजी, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मिलिंद कांबळे, रोजगार सेवक नवनाथ गवाले, बस्वराज घेवारे सर, शंकर कवठेकर, बालाजी कवठेकर सर,, गजानन सिद्धेश्वरे, बस्वराज शिवपुजे, गवाले सर,मंगेश धनुरे, दत्ता माळशेट्टे, नागेश देशमुख, एकनाथ कांबळे, मन्मथ बिरादार, गुणवंत पाटील,सौ वर्षाराणी पाटील, कल्याण पाटील यांनीही नरसिंग सोनटक्के सरांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.आमदार डॉ. तुषार राठोड साहेब यांनी कल्याण शिवलिंगराव पाटील तसेच सौ. वर्षाराणी गुणवंत पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देवून सत्कार केला तसेच आपल्या कौंटुबिक कार्यक्रमात लाडक्या बहिणींना साडी चोळी वाटप तसेच निरोप समारंभ हा स्तुत्य कार्यक्रम घडवून आणल्या बद्दल कार्यकमाचे आयोजक शिवलिंगराव पाटील यांचे कौतुक केले. निरोपमुर्ती नरसिग सोनटक्के आपल्या मनोगतातून मागील सात वर्षापासून शाळेच्या उत्कर्षासाठी गावकऱ्यांनी जे सहकार्य केलं तसेच आज माझा सत्कार करून मला निरोप दिला त्याबद्दल त्यांनी सर्वांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाला गावातील अबाल वृद्धांची तसेच लाडक्या बहिणींची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन बस्वराज घेवारे व गवाले सर यांनी केले तर उपस्थितीतांचे आभार मंगेश धनुरे यांनी मानले. सुरुचि भोजनाने कार्यक्रमाची गोड सांगता झाली.

## शिस्त, कौशल्य व तंत्रज्ञानावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ६ जानेवारी-**

सगरोळी (ता. बिलोली) येथे झालेल्या दोन दिवसीय राज्यस्तरीय मुख्याध्यापक अधिवेशनात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), कौशल्य व रोजगाराभिमुख शिक्षण, सैनिकी शिक्षण, क्रीडा व संस्कृती अशा सर्वसमावेशक शिक्षणाची गरज असल्याचे प्रतिपादन शिक्षणतज्ज्ञांनी केले. शनिवार (दि.३) रोजी या अधिवेशनाचा समारोप झाला. अधिवेशनास राज्यातील दोनशेहून अधिक मुख्याध्यापकांची उपस्थिती होती.

पहिल्या दिवशी पल्लवी कोष्टी, शरद जाधव, मेजर चंद्रसेन कुलथे, विंग कमांडर वैष्णवी टोकेकर या तज्ज्ञांनी कौशल्य व रोजगाराभिमुख शिक्षणासोबतच सैनिकी शिक्षणाचे महत्त्व विशद केले. प्राचार्य मृगांक पांडे यांनी एआय युगातील शिक्षण क्षेत्रातील अत्यावश्यक कौशल्ये, पौराणिक नैतिक शिक्षण आणि सद्यस्थितीतील भारतीय शिक्षणाच्या गरजा याविषयी आपले मत मांडले. शिक्षणाधिकारी दिलीप बनसोड यांनी, बदलत्या काळानुसार तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

प्रा. डॉ. बालाजी चिरडे यांनी देशोदेशीच्या शिक्षणपद्धतींची भारतातील शिक्षणव्यवस्थेशी तुलना करत कृतीयुक्त शिक्षणाची नितांत गरज असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये विषयाचे पूर्ण आकलन व सखोल ज्ञान असणे आवश्यक असून सध्याच्या परिस्थितीत त्याची कमतरता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

समारोपाच्या अध्यक्षीय भाषणात राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक अरविंद देशमुख यांनी, बदलत्या काळाची पावले ओळखून कार्य केल्यास प्रत्येक उपक्रम अधिक परिणामकारक, उत्कृष्ट होऊ शकतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा सखोल अभ्यास करून त्याची प्रभावी अंमलबजावणी मुख्याध्यापकांनी सुरू करावी असे आवाहन केले. या दोन दिवसीय अधिवेशनाचा उपयोग आपल्या प्रशालेच्या सर्वांगीण यशासाठी होईल असा विश्वास उपस्थित मुख्याध्यापकांनी व्यक्त केला. यावेळी व्यासपीठावर संस्कृति संवर्धन मंडळाचे चेअरमन प्रमोद देशमुख, सचिव डॉ. जयंत जकाते, सुनिल देशमुख, संजीव सगरोळीकर, राजेश महाराज देगलूरकर, संजय पाटील शेळगावकर उपस्थित होते.

## जि.प.हायस्कूल इस्लापूर येथे माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ६ जानेवारी-**

जिल्हा परिषद हायस्कूल येथे इयत्ता दहावी बॅच सन २००१-२००२ या माजी विद्यार्थांनी स्नेहसंमेलन आपल्याच शाळेमध्ये आयोजित केले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षक माधवराव वानोळे व शिक्षिका श्रीमती वंदना वानोळे यांची उपस्थिती होती कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक गजानन पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती

हा कार्यक्रम म्हणजे मैत्रीचा व शिक्षकांच्या कृतज्ञता एक सामाजिक उपक्रम म्हणून राबविण्यात आला या कार्यक्रमात सर्व जुने मित्र मैत्रिणी तब्बल २३ वर्षानंतर एकत्र आले होते, पुन्हा एकदा बालपणीच्या आठवणीला उजाळा देत आठवणी मध्ये रमले होते हा कार्यक्रम अतिशय उत्साही व आनंदी अशा वातावरणात संपन्न झाला, यावेळी माझी विद्यार्थी संदिप पाटील , बालाजी पळसपूरे, शंकर कदम, सुरेश शेळके, आकाश जयस्वाल,राहूल कापसे, विजय मुंडे, सचिन कांबळे, प्रविण जयस्वाल, प्रशांत लोखंडे, बंडू घारापूरे, बुध्ददिप पाटील, रुखमाजी बैलवाड, नरेंद्र बदुलवार आदींची उपस्थिती होती.

## किनवट येथील उच्च पातळी बंधारा प्रगतीपथावर

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ६ जानेवारी-**

किनवट शहराजवळ पैनगंगा नदीवर उभारण्यात येणारा उच्च पातळी बंधारा अखेर प्रत्यक्षात साकार होत असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे किनवट तालुक्यातील पाणीटंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे. या बंधाऱ्याचे भूमिपूजन दि. १४ ऑक्टोबर २०२४ रोजी आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते पार पडले होते. त्यानंतर या प्रकल्पाच्या कामाला गती मिळाली असून सध्या बंधारा प्रगतीपथावर आहे.

हा प्रकल्प प्रत्यक्षात साकार होण्यामागे आमदार भीमराव केराम यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा निर्णायक ठरला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या उच्च पातळी बंधाऱ्यास तांत्रिक व प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र आमदार केराम यांनी शासनाच्या विविध पातळ्यांवर सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नांना प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष बाब म्हणून या प्रकल्पाला मंजुरी दिली. त्यामुळेच किनवट येथील हा उच्च पातळी बंधारा आज प्रत्यक्षात साकार होत आहे.

सुमारे २०१ कोटी रुपये निधीतून उभारण्यात येणारा हा बंधारा पूर्ण झाल्यानंतर पैनगंगा नदीवर मोठ्या प्रमाणात पाणी साठवणूक होणार आहे. या बंधाऱ्याच्या बॅकवॉटर स्टोरेजमध्ये अंदाजे १५ किलोमीटरपर्यंत पाणी साठवले जाणार असून, याचा थेट फायदा किनवट तालुक्यातील अनेक गावांना होणार आहे. शेकडो हेक्टर शेती क्षेत्र ओलिताखाली येणार असल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होऊन शेती अर्थकारणाला बळ मिळणार आहे. आमदार भीमराव केराम यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांतून साकार होत असलेल्या या प्रकल्पामुळे किनवट तालुक्याच्या विकासाला नवी दिशा मिळणार असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

### पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार : आ. केराम



किनवट तालुक्याच्या दृष्टीने हा उच्च पातळी बंधारा विकासाचा मैलाचा दगड ठरणार असून, सिंचन, पिण्याचे पाणी आणि पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने या प्रकल्पाचे महत्त्व मोठे आहे. या प्रकल्पामुळे किनवट शहरासह ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे. उन्हाळ्यात भेडसावणारी तीव्र पाणीटंचाई दूर होणार असून, नागरिकांना वर्षभर शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे. यासोबतच वन्यजीव तसेच पाळीव जनावरांसाठीही पाण्याची शाश्वत सोय निर्माण होणार असल्याचे आ. भीमराव केराम यांनी सांगीतले.

## काँग्रेस उमेदवाराची माघार; हरमिंदरकौर गिल यांच्या पॅनलला जाहीर पाठिंबा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ६ जानेवारी-**

प्रभाग क्रमांक १७ मधील महानगरपालिका निवडणुकीत राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राष्ट्रीय आय काँग्रेसच्या उमेदवार बिराजदार प्रतिभा तुकाराम यांनी आपली उमेदवारी अधिकृतपणे मागे घेत असून, गिल हरमिंदर कौर रणजितसिंग यांच्या पॅनल ला जाहीर पाठिंबा दिला आहे. या निर्णयामुळे प्रभाग क्रमांक १७ मध्ये राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली असून, नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.



गिल हरमिंदर कौर रणजितसिंग यांच्या प्रचाराला यामुळे नवसंजीवनी मिळाल्याचे चित्र आहे.

स्थानिक विकास, नागरी सुविधा आणि पारदर्शक प्रशासन या मुद्द्यांवर आधारित नेतृत्वाला बळ मिळावे, या उद्देशाने हा पाठिंबा देण्यात आल्याचे बिराजदार प्रतिभा तुकाराम यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, या पाठिंब्यामुळे येत्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १७ चा निकाल अधिकच रंगतदार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.